# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व.इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, मुख्य कार्यालय, भाईंदर (प.)
ता.जि.ठाणे-४०१ १०१,दुरध्वनी क्र.०२२-२८१९२८२८, Email :- mbmc.pro2012@gmail.com
जनसंपर्क विभाग


जा.क्र.मनपा/जनसंपर्क/ 52 /2019-20 दि. 6 / 11 /2019

मा. स्थायी समिती सभा
दि. 22/06/2020

प्रति,
मा. नगरसचिव
सचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका
भाईंदर (प.)

प्र.क्र. 22

**विषय :** “शासकीय संदेश प्रसार नियमावली 2018” बाबत मा. स्थायी समितीस माहितीस्तव अवलोकन करणे बाबत.

**संदर्भ :** 1) शासन निर्णय क्र. मावज-2018/प्र.क्र.348/34 दि. 20/12/2018 रोजीचे पत्र.
2) मा. आयुक्त सा़ो. यांनी दि. 16/09/2019 रोजी दिलेली मान्यता.

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आपणांस कळऊ इच्छितो की, मिरा भाईंदर महानगरपालिका जनसंपर्क विभागामार्फत शासन निर्णय क्र. जाहिरात 2009/प्र.क्र.137/का-34 दि. 31/08/2009 यानुसार महानगरपालिकेच्या विविध विभागाकडून आलेल्या जाहिर निविदा सुचना/ जाहिर आवाहने इत्यादी फेरा पध्दतीने वृत्तपत्रात देण्यात येत होत्या.

परंतु शासन निर्णय क्र. मावज-2018/प्र.क्र.348/34 दि. 20/12/2018 रोजीच्या शासकीय संदेश प्रसार नियमावली 2018 नुसार मागील शासन निर्णय, शासन आदेश, शुध्दीपत्रके, परिपत्रके व अन्य स्थायी आदेश अधिक्रमित करण्यात आले व शासकीय संदेश प्रसार नियमावली 2018 नुसार कार्यवाही दि. 01/01/2019 पासून अंमलबजावणी बाबत शासन निर्णय पारित करणेत आलेला आहे. मा. आयुक्त सा़ो यांनी संदर्भ क्र. 2 नुसार सदर शासन निर्णयाची माहिती मा. स्थायी समितीस कळविणेस मान्यता दिली आहे.

तरी शासकीय संदेश प्रसार नियमावली 2018 या शासन निर्णयाची प्रत मा. स्थायी समिती यांना माहितीस्तव अवलोकन करणेस सादर.

सोबत शासकीय संदेश प्रसार नियमावली 2018 ची प्रत जोडत आहे.

कळावे.

(स्वप्निल सावंत) 6/11/19
जनसंपर्क अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

**महाराष्ट्र शासन**
**सामान्य प्रशासन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक : मावज-२०१८/प्र.क्र.३४८/३४**
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई-४०० ०३२
दिनांक : २० डिसेंबर, २०१८

**संदर्भ:** १) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.पीयूबी-१०००/प्र.क्र.७३/२०००/३४, दिनांक १ मे, २००१
२) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.पीयूबी-१०००/प्र.क्र.७३/२०००/३४, दिनांक ८ ऑगस्ट, २००१
३) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.पीयूबी-१०००/प्र.क्र.७३/२०००/३४, दिनांक १८ डिसेंबर, २००१
४) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.पीयूबी-१०००/प्र.क्र.७३/२०००/३४, दिनांक ७ मे, २००२
५) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.पीयूबी-२००५/३००/प्र.क्र.४०/३४, दिनांक १ जून, २००५
६) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.जाहिरात-२००८/७३८/प्र.क्र.८०/३४, दिनांक १३ ऑगस्ट, २००८
७) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.जाहिरात-२००९/प्र.क्र.१३७/३४, दिनांक ३१ ऑगस्ट, २००९
८) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.जाहिरात-२०१०/प्र.क्र.१०४/३४, दिनांक २६ ऑगस्ट, २०१०
९) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.मावज-२०१५/प्र.क्र.३२७/३४, दिनांक ६ ऑक्टोबर, २०१५
१०) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.मावज-२०१६/प्र.क्र.५६/३४, दिनांक ३० मार्च, २०१६
११) शासन निर्णय, सामान्य प्रशासन विभाग, क्र.पीयूबी-२०१६/प्र.क्र.३६/३४, दिनांक २४ जानेवारी, २०१७

**प्रस्तावना-**

महाराष्ट्र शासनामार्फत वृत्तपत्र व नियतकालिकांना देण्यात येणाऱ्या वर्गीकृत व दर्शनी जाहिरातीच्या वितरण धोरणाची नियमावली तयार करुन ती दिनांक १ मे, २००१ च्या शासन निर्णयाद्वारे अंमलात आली आहे. तथापि, गेल्या १५ वर्षाच्या काळात जाहिरात क्षेत्रात झालेल्या बदलाच्या अनुषंगाने वेळोवेळी नवीन नियम जाहीर करण्यात आलेले आहेत. या सर्व नियमांचे एकत्रीकरण व कालानुरुप त्यामध्ये बदल करणे, जाहिरात क्षेत्रातील बदल व सोशल मिडीयासह उदयाला आलेली नवीन प्रसारमाध्यमे लक्षात घेता या संदर्भातील सुधारित नियमावली तयार करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**शासन निर्णय-**

प्रचलित जाहिरात नियमावली, वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेले शासनादेश, नवीन उदयास आलेली प्रसारमाध्यमे यांचा अभ्यास करुन सुधारित जाहिरात वितरण नियमावली तयार करण्यासंदर्भात शासनास शिफारशी करण्यासाठी या क्षेत्रातील मान्यवर, संस्था / संघटना यांचे प्रतिनिधी तसेच शासकीय प्रतिनिधींचा समावेश असलेला अभ्यासगट महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, मुंबई यांच्या अध्यक्षतेखाली स्थापन करण्यात आला होता. या अभ्यासगटाने वेळोवेळी घेतलेल्या बैठका तसेच या अभ्यासगटाच्या उपसमितीने घेतलेल्या बैठकांच्या अनुषंगाने या नियमावलीचा आराखडा तयार करुन तो शासनाच्या मान्यतेसाठी सादर केला.

२. अभ्यासगटाने शिफारस केलेल्या नियमावलीस शासन मान्यता देण्यात येत आहे. या नियमावलीला शासकीय संदेश प्रसार नियमावली-२०१८ असे संबोधण्यात येईल. सदर नियमावली दिनांक १ जानेवारी, २०१९ पासून अंमलात येईल.

३. शासकीय कार्यालयांकडून अथवा शासकीय मंडळे, महामंडळे, प्राधिकरणे वा अन्य निमशासकीय संस्थांच्या जाहिराती वितरणाबाबत सामान्य प्रशासन विभागाकडून तसेच इतर शासकीय विभागांकडून व कार्यालयांकडून वेळोवेळी निर्गमित करण्यात आलेले यापूर्वीचे सर्व शासनादेश, शासन निर्णय, शुद्धीपत्रके, परिपत्रके, अन्य स्थायी आदेश हे अधिक्रमित करण्यात येत आहेत.

४. <u>शासकीय संदेश प्रसार नियमावली-२०१८</u>

**(मुद्रित माध्यम, श्राव्य माध्यमे, दृकश्राव्य माध्यमे, बाह्य माध्यमे, वेब आणि समाज माध्यमे व अन्य प्रसार माध्यमे)**

शासकीय संदेशाचे प्रसारण तसेच शासकीय योजनांबाबत जनजागृती करणे यासाठी वृत्तपत्रांसह अन्य माध्यमांचा अधिक प्रभावी आणि कौशल्यपूर्ण उपयोग करण्याच्यादृष्टीने ही नियमावली तयार करण्यात आली आहे. विविध समाजघटकांपर्यंत पुरेशा प्रभावीपणे पोहोचण्यासाठी केवळ वृत्तपत्रेच नव्हेतर दूरचित्रवाणी वाहिन्या, रेडिओ, बाह्यमाध्यमे, समाजमाध्यमे (सोशल मीडिया) या विविध प्रसारमाध्यमांद्वारे शासकीय संदेशांचे प्रसारण करणे हा यामागचा हेतू आहे. -सर्व संदेश सर्वांमार्फत॰ याऐवजी संदेशाच्या प्रसारणाचे नेमके उद्दिष्ट आणि संदेश कोणत्या समाजघटकांसाठी आहे, हे लक्षात घेऊन माध्यमाची निवड ही या नियमावलीतील एक महत्त्वाची तरतूद आहे. -लक्ष्यवेधी समाजघटकांपर्यत (टार्गेट ऑडियन्स) पोहोचणाऱ्या प्रसारमाध्यमांमार्फत शासकीय माहितीचे प्रभावी आणि कौशल्यपूर्ण प्रसारण॰ असा या नियमावलीचा मुख्य उद्देश आहे.

राज्यातील पत्रकारांच्या विविध संघटना तसेच अन्य पत्रकारांनी केलेल्या मागण्या/सूचना, जाहिरातीच्या क्षेत्रातील बदलांच्या अनुषंगाने अभ्यास करुन काढलेल्या निष्कर्षावरुन १) वृत्तपत्रे व अन्य मुद्रित माध्यम, २) दूरचित्रवाणी व रेडिओ, ३) डिजीटल वेब आणि सोशल मिडीया व ४) आऊटडोअर मिडीया याबाबत सर्वंकष नवीन नियमावली तयार करण्याचे विचाराधीन होते. त्यानुसार खालीलप्रमाणे नियमावली जाहीर करण्यात येत आहे.

अ) **मुद्रित माध्यम** (Print Media)
(वृत्तपत्रे- दैनिके, अर्धसाप्ताहिके/द्विसाप्ताहिके, साप्ताहिके आदी)

आ) **श्राव्य व दृकश्राव्य माध्यमे** (Audio Visual Media)
(रेडिओ, दूरचित्रवाणी वाहिन्या, सार्वजनिक ठिकाणी उद्घोषणा आदी)

इ) **बाह्य व अन्य प्रसिद्धी माध्यमे** (Outdoor / Outdoor Home Media)
(जाहिरात फलक व बिलबोर्ड, पोल किऑस्क, डिजीटल बोर्ड, सार्वजनिक ठिकाणी फ्लेक्स बॅनर, बस पॅनल किंवा शेल्टर, इल्युमिनिटेड सायनेज, वॉल पेंटींग, डिस्प्ले पॅनल आदी)

ई) **वेब आणि समाज माध्यमे** (Web & Social Media)
(सोशल नेटवर्किंग, मायक्रोब्लॉगिंग, ब्लॉगिंग, फोटो शेअरिंग, ऑडिओ-व्हिडिओ शेअरिंग, इन्स्टंट मेसेजिंग आदी)

४.१ **मुद्रित माध्यम** (Print Media)

या प्रयोजनासाठी संदर्भान्वये वेगळा असा अर्थ लावला नसल्यास पुढील ठळक संज्ञांचा व उपाधींचा अर्थ खालीलप्रमाणे लावला जाईल.

४.१.१ 'शासन' या संज्ञेत 'महाराष्ट्र शासन' हा अर्थ अभिप्रेत आहे.

४.१.२ 'मान्यताप्राप्त जाहिरात' म्हणजे महाराष्ट्र शासनाच्या कोणत्याही विभागाकडून प्रसिद्धीसाठी देण्यात आलेली कोणतीही वर्गीकृत स्वरुपाची जाहीरात. तसेच शासकीय ध्येय धोरण, विकास कार्यक्रम, समाजकल्याण कार्यक्रम, उपक्रम, योजना यांचा प्रसार, प्रबोधन किंवा अविष्कार करण्यासाठी, शासकीय संदेश प्रसारीत करणे आणि शासकीय योजनांबाबत जनजागृती करण्यासाठी देण्यात आलेली दर्शनी स्वरुपाची जाहिरात.

४.१.३ 'मान्यताप्राप्त वृत्तपत्र' म्हणजे शासकीय जाहिरातींच्या वितरणासाठी मान्यताप्राप्त यादीत समाविष्ट होण्यासाठीचे आवश्यक असलेले निकष पूर्ण करुन मान्यताप्राप्त यादीत समाविष्ट करण्यात आलेले वृत्तपत्र/नियतकालिक किंवा अन्य प्रकाशन. महाराष्ट्रातून प्रसिध्द होणारी सर्व नियतकालिके आणि परराज्यातून प्रकाशित होणारी सर्व मराठी भाषेतील नियतकालिके या यादीत समावेश होण्यास पात्र असतील.

४.१.४ 'मान्यताप्राप्त यादी' म्हणजे शासकीय जाहिरातींच्या वितरणासाठी जाहिरात यादीवर येण्यासाठीचे आवश्यक निकष पूर्ण करणाऱ्या वृत्तपत्र/नियतकालिकांची तयार करण्यात आलेली व शासनाने मान्यता दिलेली यादी.

४.१.५ 'वृत्तपत्र/नियतकालिक' म्हणजे 'प्रेस एंड रजिस्ट्रेशन ऑफ बुक्स एक्ट १८६७' (केंद्र शासनाचा १८६७ चा २५ व कायदा) अंतर्गत नोंदणी करण्यात आलेले कोणतेही नियतकालिक प्रकाशन.

४.१.६ वर्गीकृत जाहिरात म्हणजे कायद्यानुसार/ नियमानुसार वृत्तपत्रांमध्ये प्रसिद्ध करणे आवश्यक आहे असा मजकूर उदा. निविदा सूचना, लिलाव, सेवाभरती, अधिसूचना इत्यादी

४.१.७ 'जाहिरात वितरण अधिकारी' म्हणजे महाराष्ट्र शासनाच्या माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे महासंचालक किंवा त्यांनी प्राधिकृत केलेला अधिकारी. (विभागीय माहिती संचालक / उपसंचालक / जिल्हा माहिती अधिकारी / वरिष्ठ सहायक संचालक (जाहिरात)/ सहायक संचालक (जाहिरात))

४.१.८ 'मान्यताप्राप्त जाहिरात दर' म्हणजे प्रति चौरस (स्क्वेअर) सेंटीमीटरच्या प्रमाणात संबंधित वृत्तपत्रांना मंजूर करण्यात आलेला जाहिरात दर असेल.

४.१.९ नावीन्यपूर्ण उपक्रम (इनोव्हेटिव्ह) म्हणजे नेहमीच्या शासकीय दर्शनी जाहिरातीच्या ऐवजी कल्पकतेने बनविलेली, वेगळ्या आणि विशिष्ट विषयांवर आधारित असलेली जाहिरात. उदाहरणार्थ जॅकेट पूर्ण पान (पहिले पान), फ्रेंच विंडो, हाफ फ्लॅप, सोलो जाहिरात, स्पेशल फिचर्स (विशेष पुरवणी) आदी.

**४.२ वृत्तपत्रांचे संवर्ग**

वृत्तपत्रांचे 'लघु', 'मध्यम' व 'मोठे' असे तीन संवर्ग असतील.

| क्र. | वृत्तपत्राचा संवर्ग | वृत्तपत्रांचा किमान व कमाल दैनंदिन खपाचा निकष |
|---|---|---|
| १ | 'लघु' संवर्ग | 'लघु' संवर्ग दैनिकांसाठी किमान खप ३,००१ ते २०,००० प्रती<br>साप्ताहिकांसाठी किमान खप २,००० ते १०,००० प्रती |
| २ | 'मध्यम' संवर्ग | 'मध्यम' संवर्ग दैनिकांसाठी किमान खप २०,००१ ते ५०,००० प्रती<br>साप्ताहिकांसाठी किमान खप १०,००१ ते २५,००० प्रती |
| ३ | 'मोठे' संवर्ग | 'मोठे' संवर्ग दैनिक/साप्ताहिकांसाठी किमान खप ५०,००१ प्रती पेक्षा अधिक<br>साप्ताहिकांसाठी किमान खप २५,००१ अधिक |

**४.३ प्रक्रिया :**

४.३.१ मान्यताप्राप्त यादीत वृत्तपत्रांचा समावेश करणे, मान्यताप्राप्त यादीतील वृत्तपत्रांची सर्व निकषांच्या संबंधात फेरपडताळणी केल्यानंतर प्राप्त अहवालानुसार मान्यताप्राप्त यादीचे नूतनीकरण करणे, दरवाढ व श्रेणीवाढीच्या अर्जांवर विचार करणे तसेच निकष पूर्ण न करणाऱ्या वृत्तपत्राचे नाव यादीवरून कमी करणे याबाबत निर्णय घेण्यासाठी नियुक्त समितीची रचना खालीलप्रमाणे राहील.

| | | | |
|---|---|---|---|
| १. | महासंचालक, माहिती व जनसंपर्क | .. | अध्यक्ष |
| २. | संचालक (माहिती) (प्रशासन) | .. | सदस्य |
| ३. | संचालक (माहिती) (वृत्त) | .. | सदस्य |
| ४. | संबंधित विभागीय संचालक/उपसंचालक | .. | निमंत्रित सदस्य |
| ५. | उपसंचालक (वृत्त) | .. | सदस्य |
| ६. | वरिष्ठ सहायक संचालक (जाहिरात) | .. | सदस्य |
| ७. | अधिपरीक्षक, पुस्तके व प्रकाशने | .. | सदस्य सचिव |

४.३.२ या समितीच्या वर्षातून सर्वसाधारणतः दोन बैठका होतील. या बैठकीत वृत्तपत्रांचा नव्याने मान्यताप्राप्त यादीत समाविष्ट करण्याबाबतच्या अर्जांचा, दरवाढ, श्रेणीवाढ आणि वार्षिक पडताळणीचा विचार करण्यात येईल. समितीच्या वर्षातून दोन बैठका घेण्याबरोबरच महासंचालनालयास आवश्यकता भासेल तेव्हा बैठका आयोजित करण्याचे अधिकार महासंचालनालयास राहतील.

४.३.३ जाहिरात स्थायी समितीच्या बैठकांना, ज्यांच्या विभागातील वृत्तपत्रे/नियतकालिके समितीपुढे विचारार्थ असतील अशा संबंधित विभागाच्या माहिती संचालक व उपसंचालकांनी, संबंधित वृत्तपत्रांबाबतचे आपले अभिप्राय नोंदविण्यासाठी उपस्थित राहतील.

४.३.४ मान्यताप्राप्त यादीत समाविष्ट होण्यासाठी दरवाढ व श्रेणीवाढ यांच्या मागणीसाठी केलेल्या विहित नमुन्यातील अर्जात (परिशिष्ट ब) वृत्तपत्रांची यंत्रसामुग्री खपाबाबतचे अधिकृत प्रमाणपत्र, अधिकृत कागदखरेदी आणि प्रत्यक्ष कागदाचा वापर, छपाई आदेश, वाहतूक, खर्च, अभिकर्त्यांची देयके, वर्गणीदारांच्या पावत्या, अंक वितरणाचा तपशील, वाहतुकीची देयके तसेच केंद्र व राज्य शासनाचे प्रचलित कर भरल्याबाबतची देयके इत्यादी तपशील भरून देणे आवश्यक राहील. स्वत:च्या मालकीच्या मुद्रणालयात वृत्तपत्र छापण्यात येत असल्यास वृत्तपत्रांकरिता विकत घेण्यात येणाऱ्या कागदाची खरेदी स्वतंत्र असावी (अन्य छपाई कामांसाठी खरेदी करण्यात येणाऱ्या कागदासमवेत या खरेदीचे देयक असू नये) तसेच या कागद खरेदीच्या देयकावर जीएसटीची रक्कम नमूद असणे आवश्यक आहे. वृत्तपत्र अन्य मुद्रणालयातून छापून घेण्यात येत असल्यास या छपाईच्या देयकात छापण्यात येणाऱ्या प्रतींच्या संख्येसह जीएसटी नमूद केलेला असणे आवश्यक आहे. तसे असल्यासच देयक गृहीत धरण्यात येईल. आवश्यकता असल्यास त्या मुद्रणालयाच्या कागद खरेदीची देयके (जीएसटीच्या तपशीलासह) तपासण्यात येतील. तशी व्यवस्था वृत्तपत्र मालक/ संपादकांनी संबंधित मुद्रणालयासमवेत केलेली असावी. कागद खरेदीबाबत वृत्तपत्रांना सादर केलेले पुरावे संशयातीत असावे.

४.३.५ नव्याने मान्यताप्राप्त यादीत समाविष्ट होणाऱ्या, दरवाढ व श्रेणीवाढीची मागणी असलेल्या वृत्तपत्रांची पडताळणी अधिपरीक्षक, पुस्तके व प्रकाशने आणि जिल्हा माहिती अधिकारी यांच्याकडून संयुक्तरीत्या करण्यात येईल. पडताळणीचा अहवाल संबंधित विभागीय संचालक / उपसंचालक यांच्या अभिप्रायासह उपरोक्त समिती समोर सादर करण्यात येईल.

४.३.६ प्रथम प्रकाशनाच्या तारखेपासून सहा महिन्याच्या कालावधीत अखंड व नियमित प्रकाशित होणाऱ्या वृत्तपत्रांचाच मान्यताप्राप्त यादीत समावेश करण्यासाठी विचार करण्यात येईल.

४.३.७ एखाद्या वृत्तपत्राच्या आवृत्तीचा मान्यताप्राप्त यादीत स्वतंत्र समावेश करावयाचा असल्यास त्या आवृत्तीची वृत्तपत्र निबंधकाकडे स्वतंत्र नोंदणी झालेली असावी. तसेच त्याचे जिल्हादंडाधिकाऱ्यांकडे स्वतंत्र घोषणापत्र (डिक्लेरेशन) असणे आवश्यक आहे. स्वतंत्ररित्या नोंदविण्यात आलेल्या आवृत्तीमध्ये मूळ आवृत्तीपेक्षा किमान दोन स्वतंत्र पृष्ठे प्रत्येक अंकात असणे आवश्यक आहे. या दोन पृष्ठांमध्ये सर्वच्या सर्व वृत्तविषयक मजकूर ज्या क्षेत्रासाठी आवृत्ती आहे त्या क्षेत्राशी निगडीत असावा. अशा आवृत्तीचा मान्यताप्राप्त यादीत समावेश करताना किमान खपाच्या निकषाची तसेच इतर निकषांची पूर्तता करणे आवश्यक आहे. आवृत्तीच्या ठिकाणी सर्व सुविधांसह परिपूर्ण स्वतंत्र कार्यालय असणे आवश्यक आहे.

४.३.८ मान्यताप्राप्त यादीतील वृत्तपत्र/नियतकालिकांचे अंक त्यांच्या ठराविक नियत तारखांनाच प्रसिद्ध होणे आवश्यक आहे. एका वर्षात किमान अंक प्रकाशनाची संख्या खालीलप्रमाणे आवश्यक आहे.

१. दैनिकांच्या बाबतीत वर्षातून किमान ३०० अंक

२. सायं दैनिकांच्या बाबतीत वर्षातून किमान २८० अंक

३. साप्ताहिकांच्या बाबतीत वर्षातून किमान ४६ अंक

४. अर्धसाप्ताहिक/द्विसाप्ताहिकाच्या बाबतीत वर्षातून किमान ८० अंक

४.३.९ कोणतेही प्रकाशन खालील परिस्थितीत अनियमित आहे असे मानण्यात येईल.

(अ) दैनिके : ज्याचे प्रकाशन सतत एक आठवड्यासाठी बंद असेल,

(ब) साप्ताहिके : ज्याचे प्रकाशन सतत तीन आठवडे बंद असेल.

मात्र, नैसर्गिक आपत्ती अथवा मानवी नियंत्रणबाहेरील कारणांमुळे जर एखाद्या वृत्तपत्राच्या/ नियतकालिकाच्या प्रकाशनात खंड पडला तर त्यामुळे त्याचे प्रकाशन अनियमित आहे असे मानले जाणार नाही. मात्र अशा कारणांबाबत जिल्हा माहिती अधिकाऱ्यांकडे तसेच अधिपरीक्षक, पुस्तके व प्रकाशने कार्यालयाकडे वृत्तपत्राच्या अनियमितपणाबद्दलची कारणांसह माहिती एका आठवड्याच्या आत कळविणे आवश्यक राहील.

४.३.१० मान्यताप्राप्त यादीतील दैनिक/साप्ताहिकांनी त्यांचे प्रसिद्ध होणारे दोन अंक संबंधित जिल्हा माहिती अधिकारी तसेच अधिपरीक्षक, पुस्तके व प्रकाशने यांच्या कार्यालयात दररोज पाठविणे बंधनकारक राहील. मुंबई विभागातील दैनिकांनी असे प्रसिद्ध होणारे दोन अंक अधिपरीक्षक कार्यालयात दररोज पाठविणे बंधनकारक राहील.

४.३.११ प्रकाशनातील अनियमितपणा, वृत्तपत्राचा दर्जा, प्रतिज्ञापत्रामध्ये दिलेली चुकीची माहिती किंवा इतर आवश्यक निकषांची पूर्तता न करणाऱ्या, जाहिरात प्रसिध्दीमध्ये शासनाची दिशाभूल करणाऱ्या वृत्तपत्रांना मान्यताप्राप्त यादीवरुन कायमचे किंवा काही कालावधीसाठी वगळण्याचे अधिकार महासंचालक, माहिती व जनसंपर्क यांना असतील. मात्र अशी कार्यवाही करण्यापूर्वी महासंचालकांनी संबंधित वृत्तपत्राच्या व्यवस्थापनाला आपली बाजू मांडण्याची संधी देतील.

४.३.१२ भारतीय वृत्तपत्र परिषद (प्रेस कौन्सिल ऑफ इंडिया) यांनी गंभीर दखल अथवा ठपका ठेवलेल्या अथवा ताशेरे ओढलेल्या वृत्तपत्रांच्या बाबतीत त्या त्या परिस्थितीनुसार त्या वृत्तपत्राला मान्यताप्राप्त यादीवरुन कायमचे किंवा काही कालावधीसाठी वगळण्याचे अधिकार महासंचालनालयाला असतील.

४.३.१३ राष्ट्रीय ऐक्य, राष्ट्रीय सुरक्षा, सामाजिक ऐक्य, कायदा व सुव्यवस्थेस बाधक ठरणारे, जातीजातीत तेढ निर्माण असे द्वेषमूलक लिखाण करणाऱ्या, वृत्तपत्रीय आचार संहितेचा भंग करणारा मजकूर आणि छायाचित्रे छापणाऱ्या तसेच कोणतीही शहनिशा न करता वृत्तपत्रामध्ये जाहिरात देऊन आर्थिक फसवणुकीस प्रोत्साहन देणाऱ्या वृत्तपत्रांना मान्यताप्राप्त यादीवर घेण्यात येणार नाही. मान्यताप्राप्त यादीवरील वृत्तपत्रांनी असे लिखाण केल्यास अथवा छायाचित्र छापल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता यादीवरुन कमी करण्याचे अधिकार महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय यांना राहतील. तसेच असे लिखाण करणाऱ्या नियतकालिकांचे अर्ज दर्शनी जाहिरातींसाठी विचारात घेतले जाणार नाहीत.

४.३.१४ मान्यताप्राप्त यादीत समाविष्ट असलेल्या वृत्तपत्र/नियतकालिकांनी या नियमात ठरवून दिल्याप्रमाणे विहित पृष्ठसंख्येपेक्षा कमी किंवा विहित आकारापेक्षा कमी केल्यास संख्येने किंवा आकारात प्रकाशन

केल्यास अशा वृत्तपत्रांना मान्यताप्राप्त यादीतून वगळण्याचे अधिकार महासंचालक, माहिती व जनसंपर्क यांना असतील.

४.३.१५ समान मजकूर केवळ वृत्तपत्राचे नाव बदलून किंवा प्रकाशनाची तारीख बदलून छापत असल्याचे आढळल्यास मान्यताप्राप्त यादीत समाविष्ट असलेल्या अशा एखाद्या वृत्तपत्राचे जाहिरात वितरण स्थगित करण्याची कार्यवाही (प्रकाशनाच्या अनियमितपणाच्या कारणामुळे करावयाच्या कार्यवाही प्रमाणेच) माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाकडून करण्यात येईल. जी वृत्तपत्रे अशा पद्धतीने प्रसिद्ध होत असतील अशा वृत्तपत्रांना देण्यात आलेल्या जाहिरातींची देयके अदा करण्यात येऊ नयेत असे संबंधित शासकीय कार्यालयास कळविण्यात येईल.

**४.४. मान्यताप्राप्त यादीत समावेश होण्यासाठी निकष :**

४.४.१. वृत्तपत्राचा आकार व पृष्ठसंख्या

४.४.२. खाली नमूद केलेल्या आकार व पृष्ठसंख्या नसलेल्या वृत्तपत्रांना मान्यताप्राप्त यादीत समाविष्ट करण्यासाठी 'दैनिक' म्हणून मान्यता दिली जाणार नाही.

४.४.३. दैनिके : छापील मजकूर एकूण आकार ७६०० चौ.से.मी. पेक्षा कमी नसावा, त्यास 'दैनिक' म्हणून मान्यता देण्यात येईल.

४.४.४. साप्ताहिके : छापील मजकूर एकूण आकार ३५०० चौ.से.मी. पेक्षा कमी नसावा.

४.४.५. मजकुराचे प्रमाण : वृत्त/टिप्पणी/बातम्या यास एकूण मजकूर ६० टक्के व जाहिरातीचा मजकूर ४० टक्के असावा. दैनिकांबाबतीत याची मासिक सरासरी पाहिली जाईल. साप्ताहिकांबाबत ही सरासरी तीन महिन्यांची पहिली जाईल.

४.४.६. वापरण्यात येणाऱ्या वृत्तपत्राच्या कागदाची प्रतवारी, छपाईपद्धत, मुद्रण यंत्रसामुग्री, आदी बाबी मान्यताप्राप्त यादीवर समाविष्ट करताना विचारात घेतल्या जातील.

**४.५. जाहिरात दर:**

४.५.१ मान्यताप्राप्त यादीत समाविष्ट असलेल्या वृत्तपत्रांना/नियतकालिकांना वर्गीकृत तसेच दर्शनी जाहिरातींचे वितरण मान्यताप्राप्त दराप्रमाणे करण्यात येईल.

४.५.२ नव्या दराचे कोष्टक खपानुसार खालीलप्रमाणे या शासन निर्णयाच्या दिनांकापासून अमलात येईल.

**दैनिके व साप्ताहिकांसाठी**

| अ.क्र. | खपानुसार गट (प्रतींची संख्या) | प्रती चौरस से.मी. दरासाठी सूत्र |
|---|---|---|
| १ | २,००० | प्रत्येकी १ हजार प्रतींसाठी रु.७ प्रमाणे २ हजार प्रतींसाठी रु.१४<br>- २००० खपाच्या वृत्तपत्रासाठी सूत्र (वृत्तपत्राचा एकूण खप भागिले १०००) गुणिले ७ |

| | | |
|---|---|---|
| २ | ३,००१ ते २०,००० | रु.१६ अधिक (+) ३ हजार प्रतींपेक्षा जास्त प्रतींसाठी (कमाल २०,००० प्रतीपर्यंत) प्रत्येकी १ हजार प्रतींसाठी रु. १/- प्रमाणे (उदा.२०,००० प्रतींसाठी रु.३३ दर येईल).<br>- ३००१ ते २०,००० पर्यंत खप असलेल्या वृत्तपत्रांच्या दरासाठी सूत्र - रू. १६ अधिक (वृत्तपत्राचा एकूण खप वजा ३००० प्रती भागिले १००० प्रती ) गुणिले रू. १ |
| ३ | २०,००१ ते ५०,००० | रु.३३ अधिक (+) २०,००० प्रतींपेक्षा जास्त प्रतींसाठी (कमाल ५०,००० प्रतीपर्यंत) प्रत्येकी १ हजार प्रतींसाठी ५५ पैसे (उदा. ५०,००० प्रतींसाठी रु.४९.५० दर येईल).<br>२०,००१ ते ५०,००० पर्यंत खप असलेल्या वृत्तपत्रांच्या दरासाठी सूत्र - रू.३३ अधिक (वृत्तपत्राचा खप वजा २०,००० प्रती भागिले १००० प्रती ) गुणिले ५५ पैसे |
| ४ | ५०,००१ ते १,००,००० | रु.४९.५० + ५०,००० प्रतींपेक्षा जास्त प्रतींसाठी (जास्तीत जास्त १,००,००० प्रतीपर्यंत) प्रत्येकी १ हजार प्रतींसाठी ४५ पैसे. (उदा.१,००,००० प्रतींसाठी रु.७२ दर येईल).<br>- ५०,००१ ते १,००,००० पर्यंत खप असलेल्या वृत्तपत्रांच्या दरासाठी सूत्र - रू.४९.५० अधिक (वृत्तपत्राचा खप वजा ५०,००० प्रती भागिले १००० प्रती) गुणिले ४५ पैसे |
| ५ | १,००,००१ पेक्षा जास्त | इ) रु. ७२ + १,००,००० प्रतींपेक्षा जास्त प्रतींसाठी प्रत्येकी १ हजार प्रतींमागे ३५ पैसे (उदा.२,००,००० प्रतींसाठी रु.१०७.०० दर येईल)<br>- १,००,००० पेक्षा जास्त खप असलेल्या वृत्तपत्रांच्या दरासाठी सूत्र - रू.७२ अधिक (वृत्तपत्राचा खप वजा १,००,००० प्रती भागिले १००० प्रती) गुणिले ३५ पैसे |

४.५.३ एखाद्या वृत्तपत्राच्या खपात वर दर्शविलेल्या गटात १ हजार प्रतींपेक्षा कमी वाढ होत असेल आणि या वाढीमुळे त्या वृत्तपत्राची श्रेणीवाढ होत असेल अशा वृत्तपत्रास श्रेणीवाढ देण्यात येईल. परंतु वृत्तपत्राला दरवाढ देण्यात येणार नाही.

४.५.४ वृत्तपत्राचा वाचक वर्गाचा आर्थिक, सामाजिक व शैक्षणिक स्तर आणि वृत्तपत्राचा दर्जा या दोन बाबींच्या आधारे जास्तीत जास्त ५० टक्के पर्यंत अतिरिक्त दर ठरविण्याचा अधिकार तांत्रिक समितीला असेल. या ५० टक्क्यांची विगतवारी खालीलप्रमाणे असेल.

४.५.५ वाचकांचा संवर्ग (रिडर्स प्रोफाईल) बीएआरसी अथवा तत्सम वाचक संख्या मोजणाऱ्या संस्थांना प्रमाणित केल्याप्रमाणे ए-१ ते ३ या सामाजिक, आर्थिक वर्गवारीनुसार (एसईसी) त्या वृत्तपत्राचा वाचक वर्ग लक्षणीय असल्यास ३० टक्के पर्यंत अतिरिक्त दर देण्यात येईल.

४.५.६ नियतकालिकाची गुणवत्ता - नियतकालिक प्रसिद्ध करीत असलेल्या बातम्यांची/ लेखांची एकूण गुणवत्ता, बातम्यांचा दर्जा, साधनसामुग्रीचा वापर, बातम्यांच्या आशयाचे मूल्य, बातम्यांचे स्वरुप (मनोरंजक/ शैक्षणिक/माहितीपूर्ण आहे अथवा प्रेरणादायी आहे) या आधारे तांत्रिक समिती जास्तीत जास्त २० टक्के पर्यंत अतिरिक्त दराची शिफारस करेल.

४.५.७ सध्याच्या यादीवरील वृत्तपत्रांच्या बाबतीत त्यांच्या सध्याच्या दरासाठी गृहीत धरण्यात आलेल्या खपानुसार महासंचालनालय वरील नव्या सूत्रानुसार दर निश्चित करील आणि त्यानुसार मा.मुख्यमंत्री महोदयांच्या मान्यतेनंतर कार्यालयीन आदेश निर्गमित करील. नव्या नियमावलीनुसार एखाद्या वृत्तपत्राच्या बाबतीत दर कमी अथवा जास्त झाल्यास नवा दर गृहीत धरण्यात येईल. यादीवर नव्याने समाविष्ट होणाऱ्या वृत्तपत्रांच्या बाबतीत नवी नियमावली लागू राहील. मान्यताप्राप्त यादीत समाविष्ट होण्याच्या किमान खपाच्या निकषात सुधारणा करण्यात आल्याने सध्याच्या यादीत असलेल्या परंतु या किमान खपाच्या निकषात पात्र न ठरणाऱ्या वृत्तपत्रांना किमान खपाची संख्या गाठण्यासाठी मे २०१९ पर्यंतचा कालावधी देण्यात येईल. जून २०१९ मध्ये खपाची प्रत्यक्ष पडताळणी केल्यानंतर त्यांचा यादीत समावेश करण्याबाबत निर्णय घेण्यात येईल. तोपर्यंत त्यांना त्यांच्या सध्याच्या खपानुसार नवीन सूत्रानुसार दर लागू असेल. यानंतरही जी वृत्तपत्रे निकषास पात्र ठरणार नाहीत त्यांना मान्यताप्राप्त यादीतून वगळण्यात येईल.

४.५.८ वृत्तपत्राच्या दराची गणना करताना तो दर अपूर्णांकात आल्यास तो दर लगतच्या पूर्णांकात परिवर्तीत करण्यात यावा.. उदा. एखाद्या वृत्तपत्राचा दर रुपये २२.४५ झाल्यास तो रुपये २२ एवढा अलीकडच्या पूर्णांकात परिवर्तीत करण्यात यावा व तो जर रुपये २२.५० एवढा झाला असल्यास तो रुपये २३ असा पुढील लगतच्या पूर्णांकात परिवर्तीत करण्यात येईल.

४.५.९ कृष्णधवल जाहिरातीच्या मूळ दरावर ४०% अधिक रंगीत दर जाहिरातींसाठी देण्यात येत आहे. पहिल्या पानाकरिता तसेच नावीन्यपूर्ण उपक्रमाकरिता (फ्रेंच विंडो, हाफ फ्लॅप, सोलो जाहिरात) ५०% अधिक दर तसेच जॅकेट पेजसाठी १००% अधिक दर देण्यात येईल. विशिष्ट पानावर जाहिरातीचा मजकूर प्रसिद्ध करण्यासाठी कार्यादेश देण्यात आला असल्यास २५% अधिक दर देण्यात येईल. परंतु वरील नावीन्यपूर्ण बाबींसाठी दर ठरविण्याबाबत अंतिम निर्णय तांत्रिक समिती घेईल.

४.५.१० या शासन निर्णयाच्या दिनांकापासून नवीन जाहिरात नियमावली अमलात आल्यानंतर वर ४.५.२ मध्ये नमूद केलेल्या कोष्टकातील दराची महागाई निर्देशांकाशी सांगड घालून नवे दर दरदोन वर्षांनी निश्चित करण्यात येतील.

४.५.११ सलग २५ वर्षापेक्षा अधिक प्रकाशित होणाऱ्या आणि त्यापेक्षा अधिक कालावधी झालेल्या वृत्तपत्रांना अतिरिक्त रु.२/- प्रती चौ.से.मी दरवाढ देण्यात येईल.

**४.६. जाहिरात वितरण :**

४.६.१ शासनाच्या वर्गीकृत व दर्शनी अशा सर्व जाहिरातींचे वितरण फक्त माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाकडून करण्यात येईल. शासनाची सर्व महामंडळे / मंडळे, प्राधिकरणे, उपक्रम, आयोग, स्थानिक स्वराज्य संस्था, इतर स्वायत्त संस्था व राज्य शासकीय कंपन्या यांच्यामार्फत देण्यात येणाऱ्या जाहिराती कालबध्द व पूर्वनियोजनाद्वारे होण्यासाठी वर्गीकृत जाहिराती त्यांच्या स्तरावरुन वितरीत करण्यात याव्यात. तथापि, त्यांनी आपल्या वर्गीकृत जाहिरातींच्या वितरणासाठी मान्यताप्राप्त वृत्तपत्रांच्या यादीचा तसेच मान्यताप्राप्त दराचा अंगीकार करावा. सर्व शासकीय विभागांनी आणि त्यांच्या नियंत्रणाखालील मंडळे / महामंडळे / प्राधिकरण / उपक्रम यांनी त्यांच्या दर्शनी जाहिराती (Display Advertisement) तयार करण्याचे, वितरणाचे व सर्वंकष जाहिरात मोहीमा आखणी व अंमलबजावणीचे काम माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फतच करावे, कोणत्याही परिस्थितीत ही कार्यवाही स्वतंत्रपणे करण्यात येऊ नये.

४.६.२ शासनाची सर्व महामंडळे / मंडळे, प्राधिकरणे, उपक्रम, आयोग, स्थानिक स्वराज्य संस्था, इतर स्वायत्त संस्था व राज्य शासकीय कंपन्यांच्या दर्शनी जाहिरातीमधील त्यांचे बोधचिन्ह वृत्तपत्रांनी छापणे बंधनकारक राहील. महासंचालनालयाने दिलेल्या मजकुरानुसार/ आर्टवर्कनुसार ठरलेल्या दिवशी कार्यादेशानुसार जाहिरात प्रसिद्ध न झाल्यास या जाहिरातीचे देयक अदा करण्यात येणार नाही.

उद्योग, ऊर्जा व कामगार विभाग, शासन निर्णय क्र.भांखस-२०१४/प्र.क्र.८२/भाग-III/उद्योग-६, दि.०१ डिसेंबर, २०१६ मधील ४.४.२ मध्ये नमूद निविदा प्रक्रियेसाठी महाराष्ट्र शासनाचे http://mahatender.gov.in हे संकेतस्थळ उपलब्ध असल्याने संकेतस्थळावर विस्तृत स्वरुपात व वृत्तपत्रांमध्ये निविदेसंदर्भात संक्षिप्त स्वरुपात जाहिरात प्रसिद्ध करण्यात यावी.

४.६.३ माहिती व जनसंपर्क महासंचालनालयामार्फत वृत्तपत्रांना वितरित करण्यासाठी शासनाच्या विविध विभागांच्या ज्या वर्गीकृत जाहिराती प्राप्त होतात. त्या प्रसिद्धी तारखेपूर्वी किमान १० दिवस आधी महासंचालनालय किंवा महासंचालनालयाच्या संबंधित कार्यालयाकडे पाठविणे प्रत्येक शासकीय विभागास बंधनकारक राहील. ज्या शासकीय विभागाच्या जाहिराती प्रसिद्धी दिनांकापूर्वी १० दिवस आधी संबंधित कार्यालयास प्राप्त होणार नाहीत. अशा जाहिराती वृत्तपत्रांना प्रसिद्धीसाठी वितरीत केल्या जाणार नाहीत व त्या जाहिराती संबंधित कार्यालयाकडे परत पाठविण्यात येतील.

४.६.४ जी वर्तमानपत्रे शासनाची जाहिरात ३ वेळा नाकारतील त्या वृत्तपत्रांना मान्यताप्राप्त यादीवरुन कमी करणे अथवा त्यांच्या जाहिराती काही कालावधीकरिता स्थगित करण्याचे अधिकार महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय यांना राहतील.

४.६.५ वर्गीकृत जाहिरातींचे वितरण अधिकाराबाबतचे सक्षम अधिकार खालीलप्रमाणे राहील :

निविदा, सूचना, लिलाव या व्यतिरिक्त प्रसिद्धीस देण्यात येणाऱ्या वर्गीकृत जाहिराती (उदा.भरती/ अधिसूचना/ जाहीर सूचना आदी) कोणत्या संवर्गातील किती वृत्तपत्रांना प्रसिध्दीस देण्यात यावयात

याबाबत संबंधित विभाग/ कार्यालय यांना अधिकार असतील. त्याप्रमाणे महासंचालनालय वितरण करील.

| क्र. | जाहिरातीतील कामाचे एकूण मूल्य | जाहिरात वितरण करण्याचे सक्षम अधिकार | वृत्तपत्राचा संवर्ग |
|---|---|---|---|
| १ | रु.५० लाख | जिल्हा माहिती अधिकारी | जिल्ह्यातील 'लघु' संवर्गातील एक दैनिक व 'लघु' संवर्गातील एक साप्ताहिक यांना वितरण (फक्त भूसंपादनाच्या जाहिराती 'मध्यम' व 'लघु' संवर्ग दैनिकास वितरीत करण्यात येतील.) |
| २ | रु.५० लाख ते १ कोटी पर्यंत | विभागीय माहिती उपसंचालक | संबंधित जिल्ह्यातील 'मध्यम' संवर्गातील एक दैनिक व 'मध्यम' संवर्गातील साप्ताहिक (संबंधित जिल्ह्यात मध्यम संवर्गातील दैनिक व साप्तहिक नसल्यास अपवादात्मक परिस्थितीत त्या विभागातील अन्य जिल्ह्यातील दैनिक /साप्तहिक) |
| ३ | रु.१ कोटीपेक्षा अधिक | मुख्यालय | १) संबंधित जिल्ह्यातील / विभागातील 'मोठे' संवर्गातील एक दैनिक व एक साप्ताहिक (साप्ताहिक 'मोठे' संवर्गात असल्यास केवळ समानतेच्या तत्वासाठी या साप्ताहिकाचा समावेश दैनिक संवर्गात असेल)<br>आणि<br>२) संबंधित जिल्ह्यातील / विभागातील 'मध्यम' संवर्गातील एक दैनिक.<br>आणि<br>३) ज्या जिल्ह्याचे काम असेल त्या जिल्ह्यातील 'लघु' संवर्गातील एक दैनिक. |

मुंबईतील विभाग प्रमुख/प्रादेशिक प्रमुख/कार्यालय प्रमुख यांच्याकडून प्राप्त होणाऱ्या जाहिराती महासंचालनालयातील मुख्यालयामार्फत वितरित करण्यात येतील. तसेच मुंबई विभागातील 'मध्यम' व 'लघु' संवर्गातील वृत्तपत्रांना जाहिरात वितरणही मुख्यालयाकडून करण्यात येईल. मुंबई आणि उपनगरातील जाहिरातींच्या बाबतीत सर्व वर्गीकृत जाहिराती त्या त्या वर्गातील दैनिकांबरोबरच एका साप्ताहिकासही देण्यात येईल.

वर्गीकृत जाहिराती सर्वसाधारणत: वर्गवारीनुसार समानतेच्या तत्त्वाच्या आधारे वितरित करणे अपेक्षित आहे. वर्गीकृत जाहिरात देण्यापूर्वी संबंधित विभागांनी निधी उपलब्धतेचे प्रमाणपत्र माहिती व जनसंपर्क महासंचालनालयास देणे बंधनकारक राहील. वृत्तपत्रामध्ये जाहिरात प्रसिद्ध झाल्यापासून ३० दिवसांच्या आत देयके संबंधित विभागांना सादर करणे बंधनकारक राहील.

४.६.६ दर्शनी जाहिरातीच्या संदर्भात मजकुराचा लक्ष्यगट, वृत्तपत्राची त्या लक्ष्यगटांपर्यंत पोहोचण्याची सर्वसाधारण क्षमता, जाहिरातीचा उद्देश अशा विविध बाबी विचारात घेऊन महासंचालनालयाशी संबंधित कार्यालये जाहिरात वितरण करतील.

४.६.७ मान्यताप्राप्त यादीतील सर्व वृत्तपत्रांना एका आर्थिक वर्षात १ मे (महाराष्ट्र दिन), १५ ऑगस्ट (स्वातंत्र्य दिन), दिवाळी, ६ जानेवारी (दर्पण दिन), २६ जानेवारी (प्रजासत्ताक दिन), शिवजयंती, छत्रपती शाहू महाराज जयंती, १४ एप्रिल (आंबेडकर जयंती) आणि महात्मा फुले जयंती या प्रसंगानिमित्त दर्शनी जाहिराती निधी उपलब्धतेनुसार मान्यताप्राप्त दराने वितरण करण्यात येईल. तसेच १ ऐच्छिक दर्शनी जाहिरात वितरीत करण्यात येईल.

४.६.८ शासनमान्य यादी बाहेरील नियतकालिकांना जाहिरात देण्यासंदर्भात महासंचालक यांना विभाग प्रमुख या नात्याने आणि सचिव, सामान्य प्रशासन विभाग यांना प्रशासकीय विभाग म्हणून स्वतंत्र वित्तीय अधिकार ठरवून देण्यात येतील. तथापि, कोणत्याही परिस्थितीत एका आर्थिक वर्षात अशी प्रकरणे २०० पेक्षा जास्त असणार नाहीत आणि सर्वसाधारणत: एका जाहिरातीचे मूल्य रु.५,०००/- पेक्षा कमी आणि १ लाखापेक्षा जास्त असणार नाही. मान्यताप्राप्त यादीवरील व यादीबाहेरील नियतकालिकांना आणि स्मरणिका किंवा ग्रंथ यात प्रसिध्द करण्यात यावयाच्या जाहिरातींकरिता ही बाब लागू असेल.

४.६.९ यादीवरील व यादीबाहेरील नियतकालिकांना महासंचालक यांच्या अधिकारातील प्रासंगिक व ऐच्छिक दर्शनी जाहिरातीचे अर्ज विभागीय माहिती उपसंचालक यांच्या अभिप्रायासह ज्या प्रसंगासाठी जाहिरात मागणी असेल त्या प्रसंगाआधी किमान पंधरा दिवस महासंचालनालयास प्राप्त होणे बंधनकारक राहील. अशा अर्जांचा वृत्तपत्र/ नियतकालिकांच्या दर्जा, नियमितता, खप या निकषांची पूर्तता करणाऱ्या वृत्तपत्रांचीच शिफारस जाहिरात मंजुरीसाठी करण्यात यावी. याबाबतची नोंद जिल्हा व विभागीय माहिती कार्यालयांमध्ये घेऊन फक्त अभिप्रायाचे शिफारसपत्रच मुख्यालयात पाठविण्यात यावे. शिफारसपत्रासोबत वृत्तपत्रांचे मागणी अर्ज व प्रती पाठविण्यात येऊ नये.

४.६.१० यापेक्षा अधिक मूल्याची मागणी असलेले अर्ज ज्या प्रसंगासाठी दर्शनी जाहिरातींची मागणी असेल त्याप्रसंगापूर्वी किमान एक महिना आधी महासंचालनालयास प्राप्त होणे बंधनकारक राहील.

४.६.११ दैनिकांच्या अर्जासोबत १०, तर साप्ताहिकांच्या अर्जासोबत मागील ३ महिन्यांतील किमान १० अंक जोडणे आवश्यक आहे. दिवाळी अंक असल्यास मागणी ३ वर्षांचे दिवाळी अंक जोडणे आवश्यक आहे. स्मरणिका असल्यास मागील वर्षाची स्मरणिका जोडणे आवश्यक आहे. पाक्षिके / मासिके / त्रैमासिकांनी मागील ३ महिन्यातील ३ अंक जोडणेआवश्यक आहे.

४.६.१२ संबंधित नियतकालिकांनी त्यांची नियमित पृष्ठसंख्या किंवा आकार कमी केल्यास त्यांचा अर्ज विचारात घेतला जाणार नाही. (असा अंक त्यांनी स्वत:च्या मर्जीने प्रसिध्द केल्यास त्या जाहिरातींचे देयक अदा केले जाणार नाही.) अंकातील मजकूर आणि जाहिरातीचे प्रमाण ६०:४० असे असणे आवश्यक आहे.

४.६.१३ समान मजकूर केवळ वृत्तपत्राचे नाव बदलून किंवा प्रकाशनाची तारीख बदलून छापत असल्यास या नियतकालिकांचा अर्ज फेटाळण्यात येईल. तसेच एकाच कुटुंबाच्या मालकीची जास्तीत जास्त दोनच वृत्तपत्रे जाहिरात मागणीसाठी ग्राह्य समजण्यात येतील.

४.६.१४ जिल्हा माहिती अधिकाऱ्यांनी आपल्या जिल्ह्यातील प्राप्त प्रकरणे परस्पर मुख्यालयास न पाठविता संचालक (माहिती), विभागीय उपसंचालक (माहिती) यांच्यामार्फत त्यांच्या शिफारशींसह संबंधित प्रसंगाच्या किमान १० दिवस आधी महासंचालकांच्या मान्यतेसाठी सादर करावी. त्यानंतर प्राप्त होणारे अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत.

४.६.१५ विभागांनी / कार्यालयांनी राज्याबाहेरील वृत्तपत्रांमधून जाहिरात प्रसिध्दीची (वर्गीकृत / दर्शनी जाहिरात) मागणी केल्यास त्यांच्या मागणीनुसार राज्याबाहेरील वृत्तपत्रांमध्ये DAVP च्या दराने तसेच आंतरराष्ट्रीय स्तरावरील वृत्तपत्रांमधून जाहिराती प्रसिध्दीची मागणी केल्यास त्या वृत्तपत्राच्या विशेष दराने अशा जाहिराती महासंचालनालय वितरित करील. यासंदर्भात खालील (क्र. ४.६.१६ मध्ये) गठित करण्यात आलेली तांत्रिक समिती अंतिम निर्णय घेईल.

४.६.१६ राज्यातील तसेच राज्याबाहेरील आणि काहीवेळा आंतरराष्ट्रीय स्तरावर नियतकालिकांमध्ये (दैनिके, साप्ताहिके, पाक्षिके, मासिके, वार्षिके आदी प्रकाशने) शासनाचा जाहिरातविषयक मजकूर प्रसिद्ध करण्याची आवश्यकता असते. या नियतकालिकांसाठी राज्य शासनाचा अथवा केंद्र शासनाचा किंवा कोणत्याही शासकीय संस्थेचा प्रमाणित जाहिरात दर असतोच असे नाही. अशावेळी त्या नियतकालिकांना कोणत्या दराने जाहिरात द्यावी याबाबत परिस्थितीनुसार त्या प्रकाशन संस्थेशी (आंतरराष्ट्रीय प्रकाशनांच्या बाबतीत त्यांच्या भारतातील प्रतिनिधींशी) वाटाघाटी करुन दर निश्चित करण्यात येईल. सर्वसाधारणत: या धोरणात नमूद केलेल्या खपाशी निगडीत दराच्या सूत्राचा मूलभूत आधार तसेच ज्या नियतकालिकाची प्रमाणित वाचक संख्या, वाचकांचा आर्थिक-सामाजिक स्तर या बाबी हा दर ठरविताना घेणे अपेक्षित असेल. यासंदर्भात खालील गठित करण्यात आलेली तांत्रिक समिती अंतिम निर्णय घेईल.

१. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
२. संबंधित विभागाचे अधिकारी
३. संचालक (माहिती)(प्रशासन), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
४. संचालक (माहिती)(वृत्त), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
५. उपसंचालक (लेखा), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
६. उपसंचालक (वृत्त), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
७. संशोधन अधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
८. वरिष्ठ सहायक संचालक (जाहिरात), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय

४.६.१७ वृत्तपत्रांना वितरीत करण्यात आलेल्या जाहिरातींची नोंद ठेवता येणे शक्य व्हावे म्हणून वृत्तपत्रांना दिलेल्या प्रत्येक जाहिरातीच्या वितरण आदेशाच्या मूळ प्रतीची नोंद माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या संबंधित कार्यालयाकडे ठेवणे बंधनकारक राहील. ज्या शासकीय विभागाची

जाहिरात असेल त्या शासकीय कार्यालयाकडे त्या जाहिरातीची देयके चुकती करण्यासाठी पाठवितांना त्या देयकावर "तिसरी प्रत माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या संबंधित कार्यालाकडे पाठविण्यात आली आहे" अशी नोंद घेणे आवश्यक राहील. ज्या देयकावर अशी नोंद नसेल त्या देयकाची रक्कम संबंधित शासकीय कार्यालयाकडून चुकती करण्यात येणार नाही.

४.६.१८ जी वृत्तपत्रे देयकाची अशी तिसरी प्रत माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाच्या संबंधित जाहिरात वितरण करणाऱ्या कार्यालयात पाठविणार नाहीत त्यांच्या जाहिराती स्थगित करण्यात येतील व हे अधिकार त्या वृत्तपत्रांना जाहिरात वितरण करणाऱ्या अधिकाऱ्यास असतील.

**४.७. पडताळणी :**

४.७.१ खपासाठी केंद्र शासनाचे वृत्तपत्र निबंधक (आरएनआय), ऑडिट ब्युरो ऑफ सर्क्युलेशन (एबीसी), किंवा सनदी लेखापाल (सीए) प्रमाणपत्र विहीत नमुन्यात आवश्यक असेल. तसेच आरएनआय, एबीसी किंवा सीए प्रमाणपत्रधारक वृत्तपत्रांची महासंचालनालयातर्फे प्रत्यक्षात पडताळणी करण्यात येईल.

४.७.२ खपाच्या पडताळणीबाबत माहिती व जनसंपर्क महसंचालनालयाच्या उपसंचालक / जि.मा.अ. / अधीपरीक्षक (पु.व प्रका.) या अधिकाऱ्यांना कोणत्याही वृत्तपत्र/ नियतकालिकाच्या मुद्रण व प्रकाशन स्थळास भेट देऊन छपाई यंत्राची क्षमता, कागद खरेदी, पोष्टाचे प्रमाणपत्र, एस.टी./रेल्वेने वृत्तपत्रांच्या एकूण अंकाच्या संख्येसह पाठविले जाणारे वृत्तपत्रांचे गठ्ठे, छपाई आदेश, बिले, त्याच्या पावत्या, वर्गणीदार असल्यास त्यांची यादी, पावत्या, वितरणासंबंधीची वाहतुकीची बिले आदी तपशिलाची माहिती घेण्याचे व त्याआधारे संबंधित वृत्तपत्राच्या खपाचे आकडे तपासण्याचे अधिकार राहतील.

४.७.३ सदर वृत्तपत्रांच्या वार्षिक पडताळणीसाठी आवश्यक कागदपत्रे तसेच यंत्रणा महासंचालनालय सांगेल त्या व्यक्तीला/संस्थेला उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी संबंधित वृत्तपत्राची असेल. एखादे वृत्तपत्र छपाई, वितरण अथवा अन्य बाबींसाठी त्रयस्थांची नेमणूक करीत असल्यास त्या यंत्रणेची संबंधित वृत्तपत्राच्या कामापुरती तपासणी करण्याचा महासंचालनालयास अधिकार असेल त्याबाबतची तजवीज करुन घेण्याची जबाबदारी संबंधित वृत्तपत्राची राहील. याकरिता महासंचालनालय हे क्वचित प्रसंगी आवश्यकतेनुसार अन्य कार्यालयाची/बाहेरील संस्थेची मदत घेईल. विभागीय संचालक/उपसंचालक हे त्यांच्या क्षेत्रातील वृत्तपत्रांच्या पडताळणीबाबत मुख्य नियंत्रक असतील. वार्षिक पडताळणी झाल्यानंतर वृत्तपत्रांची अंतिम यादी नियंत्रक/उपसंचालक यांच्या समवेत करण्यात येईल. ही पडताळणी करताना वृत्तपत्रांची नियमितता व खपाबाबतची कागदपत्रे यांची यादी तयार करुन ती स्थायी समिती समोर ठेवण्यात येईल. निकषास पात्र ठरणाऱ्या वृत्तपत्रांची नव्याने मान्यताप्राप्त यादी महासंचालनालय स्तरावरच तयार करण्यात येईल. निकषास पात्र न ठरणाऱ्या वृत्तपत्रांना मान्यताप्राप्त यादीतून वगळण्यात येईल.

४.७.४ मान्यताप्राप्त यादीचे दरवर्षी नूतनीकरण करतांना जिल्हा महिती अधिकारी यांनी आपल्या अहवालासोबत वृत्तपत्रांकडून आर.एन.आय.(रजिस्टार ऑफ न्यूजपेपर ऑफ इंडिया) ला पाठविण्यात येणाऱ्या (Annual Statement) वार्षिक अहवालाची प्रतही पाठवावी.

४.८ वरील नियमावलीनुसार अन्य विभागांच्या तसेच महासंचालनालयाच्या जाहिराती वितरीत करण्याचे तसेच महासंचालनालयाच्या जाहिरातींकरिता महासंचालनालयाकडे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या आर्थिक तरतुदीतून करावयाच्या जाहिरातींसाठीच्या खर्चाची देयके अदा करण्याचे प्रशासकीय व वित्तीय अधिकार महासंचालक, माहिती व जनसंपर्क यांना राहतील.

**४.९ श्राव्य व दृकश्राव्य माध्यमे (Audio Visual Media)**

आधुनिक प्रसारमध्यमांच्या तुलनेत दूरचित्रवाणी वाहिन्यांचे महत्त्व अजूनही अबाधित आहे. दूरचित्रवाणी वाहिन्याद्वारे शासकीय संदेशाचे प्रसारण करण्यासाठी माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाचे पुढीलप्रमाणे नियमावली असेल.

**४.९.१ संकल्पना आणि संक्षिप्त रुपे**

अ) **ब्रॉडकास्ट ऑडियन्स रिसर्च कॉन्सिल (बीएआरसी)** - केंद्र शासनाच्या पुढाकाराने स्थापन करण्यात आलेली दूरचित्रवाणी वाहिन्यांची तसेच जाहिरात संस्थांची मान्यताप्राप्त प्रतिनिधिक संघटना पूर्वी टीएएम (टॅम) ही खाजगी संस्था प्रेक्षकसंख्या मापनाचे (ऑडियन्स मेजरमेंट) काम करीत असे. तथापि, आता बीएआरसी प्रेक्षकसंख्या मापनाचे कार्य करते. देशातील सर्व वाहिन्यांच्या कार्यक्रमांची प्रेक्षकसंख्या दर आठवड्याला बीएआरसीच्या वतीने जाहीर करण्यात येते. त्याप्रमाणे टेलिव्हिजन रेटिंग (टीव्हीआर) ठरविण्यात येतो.

आ) **टेलिव्हिजन रेटिंग पॉईंट (टीव्हीआर)-** एखाद्या दूरचित्रवाणी वाहिनीचा विशिष्ट कार्यक्रम विशिष्ट प्रेक्षक लक्ष्यगटातील (एखाद्या क्षेत्रात, विशिष्ट वयोगटात, सामाजिक, आर्थिक लक्ष्यगटात) किती लोकांनी बघितला त्या प्रेक्षकांची टक्केवारी एकूण कार्यक्रमांच्या टक्केवारीच्या आधारे त्या दूरचित्रवाणी वाहिनीची त्या आठवड्यातील प्रेक्षक टक्केवारी काढण्यात येते). उदा. एखाद्या वाहिनीचा टिव्हीआर १% असल्यास त्याचा अर्थ त्या प्रेक्षक संवर्गात (म्हणजे महाराष्ट्रातील १५ वर्षांपुढील, सर्व सामाजिक, आर्थिक संवर्गातील प्रेक्षकापैकी) १% लोकांनी त्या वाहिनीचे कार्यक्रम पाहिले आहेत.

इ) **कॉस्ट पर रेटींग पॉईंट (सीपीआरपी)-** १ टीव्हीआर मिळविण्याकरिता संदेश देणारी संस्था किती रक्कम खर्च करण्यास तयार आहे ती संख्या.

ई) **कॉस्ट पर साऊंड (सीपीटी)-** एक हजार प्रेक्षकांपर्यंत पोहचण्यासाठी (रिच) येणारा खर्च

उ) **रिच-** किती लोकांपर्यंत वाहिनीचे कार्यक्रम पोहचले आहेत, (त्यांनी ते पहिले असतील असे नाही) ती संख्या

ऊ) **स्क्रोल-** दूरचित्रवाणी वाहिनीच्या पडद्यावर तळाशी उजवीकडून डावीकडे सरकणारी संदेशाची पट्टी

ए) **एल बॅण्ड-** दूरचित्रवाणी वाहिनीच्या पडद्यावर प्रकाशित भागाचा आकार लहान करुन इंग्रजी एल अद्याक्षरांच्या डिझाईनमध्ये संदेशाचे चित्र आणि अक्षरे यासह प्रसारण

ऐ) **एस्टन बॅण्ड-** दूरचित्रवाणी वाहिनीच्या पडद्यावर कार्यक्रमाच्या तळाशी डिझाईन आणि अक्षरे यासह स्थिर राहणारी छोटी पट्टी.

ओ) **सामाजिक आर्थिक संवर्ग (सोशिओ इकोनॉमिक कॅटेगरी-एसईसी)**- निरक्षर ते पदव्युत्तर शिक्षण अशा विविध गटातील व्यक्ती त्यांच्या आर्थिक परिस्थितीनुसार (त्यांच्याकडे असलेल्या साधनसंपत्तीच्या आधारे) विशिष्ट संवर्गात नमूद केली जाते. शिक्षण आणि साधन संपत्ती आधारे ए-१ ते ई-३ या विविध संवर्गात ही वर्गवारी दर्शविली जाते. यात ए-१ म्हणजे उच्चशिक्षित श्रीमंत व्यक्ती तर सी-१ म्हणजे १२वी पर्यंतचे शिक्षण घेतलेली मध्यम उत्पन्न असलेली व्यक्ती आणि ई-३ म्हणजे अतिशय गरीब उत्पन्न निरक्षर व्यक्ती.

औ) **टाईम बॅण्ड** - दराचे सूत्र ठरविताना खालीलप्रमाणे टाइमबँड गृहीत धरण्यात येतील.

| | |
|---|---|
| वृत्त वाहिन्यांकरीता | सकाळी ६ ते दुपारी १२. नॉन प्राईम टाईम |
| | दुपारी १२ ते सायं. ५. प्राईम टाईम |
| | सायं. ५ ते सायं. ७. नॉन प्राईम टाईम |
| | सायं. ७ ते रात्रो १०. सुपर प्राईम टाईम |
| | रात्रो १० ते रात्रो ११. प्राईम टाईम |
| मनोरंजन वाहिन्यांकरीता | सकाळी ७ ते सायं. ७. नॉन प्राईम टाईम |
| | सायं. ७ ते सायं. ८. प्राईम टाईम |
| | सायं. ८ ते रात्रो १०. सुपर प्राईम टाईम |
| | रात्रो १० ते रात्रो ११. प्राईम टाईम |

**४.९.२. दूरचित्रवाणी वाहिनी निवडसूचीत समाविष्ट होण्यासाठी पात्रता**

अ) केंद्र शासनाच्या संदेशवहन मंत्रालयाच्या वायरलेस प्लॅनिंग कक्षाचे (डब्ल्यूपीसी) संदेश प्रसारणासाठीचे प्रमाणपत्र मिळालेली वाहिनी

आ) केंद्र शासनाच्या दूरसंचार विभागाचे दूरचित्रवाणी वाहिनी सलगपणे सुरू असल्याचे प्रमाणपत्र मिळालेली वाहिनी

इ) दूरचित्रवाणी वाहिनी सलगपणे सुरू असल्याबाबत आणि त्यावरुन प्रसारित होणाऱ्या कार्यक्रमांच्या आशयाबाबत तसेच त्या वाहिनीने आचार संहितेचा भंग केला नसल्याबाबत केंद्र शासनाच्या माहिती आणि नभोवाणी मंत्रालयाच्या इलेक्ट्रॉनिक मिडिया मॉनिटरींग सेंटर (ईएमसीसी) या केंद्राचे प्रमाणपत्र मिळालेली वाहिनी

ई) अप लिंकिंग डाऊन लिंकिंग साठी मिळालेला केंद्र शासनाचा परवाना मिळालेली वाहिनी

उ) सकाळी ६ ते रात्री ११ या वेळेत दररोज १७ तासांचे प्रसारण करणारी मागील ६ महिने कार्यरत असलेली वाहिनी.

ऊ) स्थानिक केबल टीव्ही या वाहिन्यांचा टीव्हीआर उपलब्ध नसल्याने तसेच या वाहिन्यांवर संदेश प्रसारित झाल्याची खातरजमा करण्यासाठी प्रभावी व्यवस्था नसल्याने स्थानिक केबल वाहिन्यांबाबत स्वतंत्र विचार करण्यात येईल.

**४.९.३. निवडसूचीकरीता सादर करण्यात यावयाची कागदपत्रे**

अ) संस्थेचे प्रमाणपत्र

आ) NOCC-Network Operation and Control Centre या केंद्राचे प्रमाणपत्र

इ) ईएमसीसी प्रमाणपत्र

ई) वेळापत्रक, उदा. मागील ६ महिन्यांमधील, सकाळी ६ ते संध्याकाळी ११ वाजेपर्यंत कार्यक्रमाचा तपशील देणारा फिक्स्ड पॉईंट चार्ट (एफपीसी)

उ) इंडियन फायनँशियल सिस्टम कोड (आयएफएससी) नॅशनल इलेक्ट्रॉनिक फंड्स ट्रान्स्फर (एनईएफटी)/ इलेक्ट्रॉनिक क्लिअरींग सर्व्हिस (ईसीएस) तपशीलासह कंपनीचे नाव असलेले रद्द केलेले धनादेश.

ऊ) ज्या टेलिपोर्ट ऑपरेटरव्दारे वाहिनीचे कार्यक्रम अपलिंक केले जातात त्या ऑपरेटरचे सरासरी कार्य वेळाबाबत प्रमाणपत्र

ए) वाहिनीच्या प्रेक्षक संख्येबाबत (टिव्हीआर) १३आठवड्यांचा (मागील १३ आठवडे) बीएआरसी अहवाल (लक्ष्यगट संपूर्ण महाराष्ट्र, एनसीसीएस सर्व, १५ वर्ष व या पेक्षा अधिक व्यक्ती.)

ऐ) ही नियमावली मान्य असल्याचे दूरचित्रवाणी वाहिनीचे देकार पत्र

**४.९.४ निवडसूचीतून दूरचित्रवाणी वाहिनीचा समावेश रद्द करणे.**

अ) संस्थेचे प्रमाणपत्र दूरचित्रवाणी वाहिनीचे नाव किंवा बोधचिन्ह बदलल्यानंतर तशी सूचना माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाला न दिल्यास

आ) महासंचालनालयाने दिलेल्या कार्यादेशाचे पूर्णपणे पालन न झाल्यास

इ) दूरचित्रवाणी वाहिनीने महासंचालनालयास दिलेले कोणतेही कागदपत्र अथवा माहिती खोटी असल्याचे आढळल्यास

ई) प्रसारित केल्या जाणाऱ्या कार्यक्रमाच्या दर्जाबाबत अथवा आशयाबाबत वाहिनी दोषी आढळल्यास.

**४.९.५ दरासाठी सूत्र**

अ) **स्पॉट दर** : प्रत्येक टाइम बँडनुसार १० सेकंदासाठी दर ठरविण्याकरीता सीपीआरपी ५००० गृहीत धरुन)मनोरंजन वाहिन्यांसाठी विविध टाइमबॅंडसाठी क्ष दर = २४० + { (५०००)X या टाइमबॅंडचा TVR } वृत्त वाहिनीसाठी विविध टाइमबँडचा क्ष दर = ३५० + { (५०००)X या टाइमबॅंडचा TVR } टीव्हीआर हा बीएआरसीनुसार सरासरी १३ आठवड्यांचा (शेवटचे १३ आठवडे) ४ दशांश स्थानापर्यंतचा असेल. लक्ष्यगट संपूर्ण महाराष्ट्र, एनसीसीएस सर्व, वय वर्ष १५ पेक्षा अधिक असलेल्या व्यक्ती वरील टिव्हीआरप्रमाणे येणारा 'क्ष' दर त्या वाहिनीसाठी महासंचालनालयाने ठरवून दिलेला प्रमाणित दर

(Standard Rate) असेल. त्याशिवाय वाहिनीच्या प्रेक्षकांचा संवर्ग आणि वाहिनीवरील कार्यक्राचा दर्जा या दोन बाबींआधारे जास्तीत जास्त ५० टक्के पर्यंत अतिरिक्त दर ठरविण्याचा अधिकार तांत्रिक समितीला असेल. या ५० टक्क्यांची विगतवारी खालीलप्रमाणे असेल.

आ) **प्रेक्षकांचा संवर्ग (ऑडियन्स प्रोफाईल)** बीएआरसी अथवा तत्सम प्रेक्षक संख्या मोजणाऱ्या संस्थांना प्रमाणित केल्याप्रमाणे ए-१ ते ३ या सामाजिक, आर्थिक वर्गवारीनुसार (एसईसी) त्या वाहिनीचा प्रेक्षक संवर्ग लक्षणीय असल्यास ३० टक्के पर्यंत अतिरिक्त दर देण्यात येईल.

इ) **कार्यक्रमांची गुणवत्ता** - वाहिनी प्रसारित करीत असलेल्या कार्यक्रमांची एकूण गुणवत्ता, प्रक्षेपणाचा दर्जा, छायाचित्रणाचा दर्जा, साधसामुग्रीचा वापर, कार्यक्रमाच्या आशयाचे मूल्य, कार्यक्रमांचे स्वरुप (मनोरंजक/शैक्षणिक/माहितीपूर्ण आहे अथवा प्रेरणादायी आहे) या आधारे तांत्रिक समिती 'क्ष' दराचा दर जास्तीत जास्त २० टक्के पर्यंत अतिरिक्त दराची शिफारस करेल.

ई) वरील 'क्ष' दर व अतिरिक्त दर एकत्रित केल्यानंतर मिळणारा दर हा त्या वाहिनीचा अंतिम 'क्ष' दर असेल

उ) विविध टाइमबँडचा 'क्ष' दर हा त्या त्या टाइमबँडसाठी असेल

ऊ) प्राइम टाईमसाठी दर अंतिम 'क्ष' * १.२ असेल

ए) सुपर प्राइम टाइमसाठी दर अंतिम 'क्ष' * १.३ असेल

ऐ) वरील सूत्राच्या आधारावर येणारे दर नियमित टीव्ही स्पॉटसाठी लागू असतील

ओ) एका विशिष्ट कार्यक्रमातच स्पॉट दाखविण्याची महासंचालनालयाला आवश्यकता भासल्यास, विशिष्ट चॅनलच्या त्या विशिष्ट कार्यक्रमाच्या शेवटच्या १ महिन्यासाठी सरासरी टीव्हीआरच्या आधारावर स्पॉटसाठी दर निश्चित केला जाईल. मागील १.१० मध्ये सर्वसाधारण टाईम बॅंड नमूद केले आहेत. तथापि, अनेक वृत्त वाहिन्यांचे प्राईम टाईम आणि नॉनप्राईम टाईम हे त्यांच्या कार्यक्रमाच्या लोकप्रियतेनुसार वेगवेगळे असू शकतात.उदा. एखाद्या मनोरंजन वाहिनीवरील सायं ६ वा. (डीएव्हीपीच्या सूत्रानुसार नॉन प्राईम टाईम) प्रसारित होणारा कार्यक्रम हा वाहिनीचा अत्यंत लोकप्रिय आणि चॅनल ड्रिव्हन फ्लॅगशिप कार्यक्रम असू शकतो. पण मग त्या वेळेत संदेश प्रसारणाचा दर जास्त असला पाहिजे. त्यामुळे एखाद्या वाहिनीवरील एखाद्या कार्यक्रमाचा टिव्हीआर हा सर्वसाधारण सरासरी एकूण टीव्हीआरपेक्षा २०% अथवा ३० % जास्त असेल तर तो कालावधी अनुक्रमे प्राईम टाईम किंवा सुपर प्राईम टाईम याप्रमाणे असेल.

औ) **एल बॅंड:** अंतिम 'क्ष' * १.२ (१० सेकंद) * (टाइमबॅंडनुसार १ किंवा १.२ किंवा १.३)

अं) **एस्टन बॅंड:** अंतिम 'क्ष' * ०.६ (१० सेकंद) * (टाइमबॅंडनुसार किंवा १.२ किंवा १.३)

अः) **स्क्रोलसाठी** (८० अक्षरे एका दिवसात ९६ वेळ)

क) एका दिवसासाठी प्रत्येक टाइमबँडसाठी आलेल्या 'क्ष' दराची एकूण सरासरी 'क्ष' *५

ख) दिवसा साठी प्रतिदिन प्रत्येक टाइमबँडसाठी आलेल्या 'क्ष' दराची एकूण सरासरी 'क्ष' *३ असेल

ग) दिवसांपेक्षा जास्त प्रतिदिन प्रत्येक टाइमबँडसाठी आलेल्या 'क्ष' दराची एकूण सरासरी 'क्ष' *१.५

घ) **प्रायोजित कार्यक्रम-** वाहिनीवरील एखादा कार्यक्रमाचे प्रायोजकत्व (Sponsorship) देण्याकरिता पुढीलप्रमाणे सूत्र असेल - :

१) त्या वाहिनीसाठी निश्चित करण्यात आलेल्या स्पॉटचा दर प्रायोजित कार्यक्रमा दरम्यान दाखविण्यात येणाऱ्या स्पॉटकरिता लागू असेल.

२) कार्यक्रमाच्या नावापूर्वी व नावानंतर महाराष्ट्र शासनाच्या/ महासंचालनालयाच्या/ योजनेचा किंवा महासंचालनालयाने निश्चित केलेल्या घोषवाक्याचा ठळकपणे उल्लेख करणे, निवेदनामध्ये असा उल्लेख ठळकपणे करणे याकरिता, तांत्रिक समिती वाहिनीने दिलेल्या दरानुसार दर निश्चित करील तथापि याकरिता दिली जाणारी रक्कम कोणत्याही परिस्थितीत त्या कार्यक्रमात दाखविण्यात येणाऱ्या स्पॉटसाठी दिल्या जाणाऱ्या एकूण रकमेच्या (Billing) ५० टक्के पेक्षा जास्त नसावी.

ङ) **माहितीपट प्रसारणासाठी -** महासंचालनालयाने तयार करुन दिलेले माहितीपट, लघूपट, चर्चात्मक कार्यक्रम, मुलाखती, शासकीय योजनांची माहिती देणारे व्हिडीओ (ज्याचा कालावधी ३ मि. पासून ते ३० मि. पर्यंत असू शकतो) त्याचे प्रसारण करण्याकरिता वाहिनीला द्यावयाची रक्कम पुढील सूत्रानुसार निश्चित करण्यात येईल- (स्पॉटसाठी निश्चित करण्यात आलेला दर — प्रसारणाचा कालावधी) ÷ ३/४ उदा. वाहिनीचा स्पॉटचा दर १० सेकंदासाठी. रुपये १ हजार असल्यास एका मिनिटाकरिता रु.६ हजार प्रमाणे २० मि. लघुपटासाठी/ माहितीपटासाठी एकूण दर होईल- रुपये ६ हजार — २० मिनिटे ÷ ३/४ = रुपये ९० हजार.

च) **विशेष कार्यक्रम निर्मिती प्रसारण-** वाहिनीकडील उपलब्ध साधनसामुग्रीतून एखाद्या कार्यक्रमाची निर्मिती करावयास सांगितल्यास तसेच त्या वाहिनीने त्याचे प्रसारण केल्यास प्रसारणासाठी वरील **ङ** प्रमाणे दर निश्चितकरुन निर्मितीचा खर्च म्हणून या प्रसारण खर्चाच्या ५० टक्के ते १०० टक्के एवढी रक्कम निर्मिती खर्च म्हणून देण्यात येईल. निर्मिती खर्चाची रक्कम किती असावी याचा निर्णय कार्यक्रमाचे स्वरुप, त्यातील घटक, त्याच निर्मिती मूल्य, यासाठी वापरण्यात आलेले तंत्रज्ञान तसेच कार्यक्रमातील सहभागी व्यक्तींचे समाजातील स्थान या बाबी लक्षात घेऊन तांत्रिक समिती दर निश्चित करील.

छ) **थेट प्रसारण -** कार्यक्रमाचे/शासकीय सोहळ्याचे/वाहिनीवरुन थेट प्रक्षेपण करावयाचे असल्यास एकूण प्रक्षेपण कालावधीकरिता होणारा प्रसारण खर्च वाहिनीला देण्यात येईल. त्या प्रसारणाचा दर वरील **ङ** मध्ये नमूद केल्याप्रमाणे असेल. थेट प्रसारणाची तांत्रिक सुविधा तसेच चित्रीकरणाची सुविधा करण्याबद्दल वरील **च** प्रमाणे प्रसारण खर्चाच्या ५० टक्के ते १०० टक्के पर्यंत खर्च देण्यात येईल. कोणत्या दराने हा खर्च द्यावा, कार्यक्रमाचे स्वरुप, कार्यक्रमाचे ठिकाण त्यासाठी उपलब्ध करुन दिल्या जाणाऱ्या तांत्रिक सोयीसुविधा या आधारे तांत्रिक समिती अंतिम निर्णय घेईल.

ज) वरील 'क्ष' व अतिरिक्त दर एकत्रित केल्यानंतर मिळणारा दर हा त्या वाहिनीचा अंतिम 'क्ष' दर आहे. जास्त टीव्हीआर असू शकणे हे थेट प्रसारित होणारे कार्यक्रम/सोहळे काही कार्यक्रमांचे (विशेषत: क्रीडा

स्पर्धा किंवा विशिष्ट औचित्यप्रसंगी थेट प्रसारण होणाऱ्या कार्यक्रमांचे टीव्हीआर नेहमीपेक्षा कितीतरी अधिक असू शकतात. मात्र या प्रसारणाचे टीव्हीआर प्रसारणानंतर उपलब्ध होऊ शकतात. अशा प्रसारणासाठी टिव्ही स्पॉट द्यावयाचे असल्यास महासंचालनालय स्पॉट प्रसारणाचे नियमित दरानुसार कार्यादेश देईल.

झ) यादीवर नसलेल्या दूरचित्रवाणी वाहिन्यांवर (उदा. राष्ट्रीय दूरचित्रवाहिन्या) शासकीय यंत्रणेला संदेशाचे प्रसारण करावयाचे असल्यास त्या वाहिनीचा या धोरणात नमूद केल्याप्रमाणे दर ठरवून अथवा डिएव्हीपी दरानुसार कार्यादेश देण्यात येतील.

ञ) वरील बाबींव्यतरिक्त अन्य कोणत्याही विशेष प्रसारणासाठी तांत्रिक समिती त्याच वेळी दर ठरवील. तथापि त्यासाठी वर नमूद केलेले सूत्र आधारभूत असले. या विशेष प्रसारणासाठी दर कसा निश्चित केला ते तपशिलात नमूद करावे लागेल.

४.९.६. **वितरण**

संदेशाचे स्वरुप, संदेशाचा लक्ष्यगट (टार्गेट ऑडियन्स), वाहिनीचे वैशिष्ट्ये आदी लक्षात घेऊन एखादा संदेश कोणत्या वाहिनीला, किती वेळा (फ्रिक्वेन्सी) किती दिवसांसाठी द्यायचा याचा निर्णय माहिती व जनसंपर्क महासंचालनालय घेईल.

४.९.७. **दर नूतनीकरण**

दराचे नूतनीकरण सर्वसाधारणत: दरवर्षी करण्यात येईल. आपल्या टीव्हीआरमध्ये लक्षणीय वाढ झाल्याच्या वाहिनीचा दावा असेल तर वाहिनी याबाबत नूतनीकरणासाठी पुराव्यासह एक वर्षानंतर अर्ज करु शकेल. तथापि, एखादा वाहिनीचा टीव्हीआर लक्षणीयरित्या कमी झाल्याचे महासंचालनालयाला आढळल्यास महासंचालनालय संबंधित वाहिनीला आपले म्हणणे मांडण्याची संधी देऊन त्या वाहिनीचा दर कमी करु शकेल.

**४.९.८ तांत्रिक समिती-**

१. महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
२. संबंधित विभागाचे अधिकारी
३. संचालक (माहिती)(प्रशासन), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
४. संचालक (माहिती)(वृत्त), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
५. उपसंचालक (लेखा), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
६. उपसंचालक (वृत्त), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
७. संशोधन अधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय
८. वरिष्ठ सहायक संचालक (जाहिरात), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय

वर नमूद नव्या धोरणानुसार सध्या डिएव्हीपीच्या दराने दूरचित्रवाणी वाहिन्यांना जाहिरात देण्यात येत आहे. या वाहिन्यांचा नव्या धोरणानुसार दर निश्चित होईपर्यंत डिएव्हीपीच्या दराने जाहिरात देण्यात येईल.

**४.१० रेडीओ संदेश प्रसारण नियमावली**

आधुनिक प्रसारमाध्यमांमध्ये रेडीओचे महत्त्व आजही कायम आहे. एवढेच नव्हे तर एफएम वाहिन्यांमुळे ते वाढत आहे. रेडीओच्या माध्यमातून विविध उपक्रमांमार्फत जनजागृती करण्यात येते. माहिती व जनसंपर्क महासंचालनालय हे सध्या केंद्र शासनाच्या विज्ञापन और दृकश्राव्य निदेशालय (डीएव्हीपी) यांनी निश्चित केलेल्या दरानुसार रेडिओवरुन संदेशाचे प्रसारण करते. रेडिओच्या प्रेक्षक संख्येबाबत कोणतेही अधिकृत आकडेवारी उपलब्ध नाही. ज्याकरिता बार्क व आयआरएस कार्य करीत आहेत. ही अधिकृत आकडेवारी उपलब्ध होईपर्यंत महासंचालनालय डीएव्हीपीने ठरविलेल्या दरानुसार रेडिओवरुन खाजगी एफ.एम.वाहिन्या व कम्युनिटी रेडिओ केंद्र संदेशाचे प्रसारण करील. 'आकाशवाणी' साठी आकाशवाणीचे दर ग्राह्य धरण्यात येतील. मात्र डीएव्हीपीने निश्चित केलेले दर केवळ जिंगल्ससाठी/स्पॉटसाठी निश्चित करण्यात येतात. त्या व्यतिरिक्त खालील बाबींचा समावेश महासंचालनालयाकरिता करण्यात येत आहे.

अ) आरजे : लाईव्ह निवेदनात शासनाची विविध माहिती जनतेपर्यंत पोहचवतील. यासाठी खालीलप्रमाणे डीएव्हीपी प्रमाणे दर लागू असतील. उदा. १० सेकंदापर्यंत आरजे मेन्शन असल्यास १० सेकंदाचा दर लागू असेल.

आ) विशेष कार्यक्रम : या उपक्रमांतर्गत ५ ते २५ मिनिटापर्यंत माहिती प्रसारणाचा विशेष कार्यक्रम करता येईल. त्यासाठी खालीलप्रमाणे दर लागू असतील.

१. प्रसारणाचे दर (डीएव्हीपी) नुसार

२. निर्मिती खर्च (डीएव्हीपी) नुसार

इ) या व्यतिरिक्त माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाला अन्य प्रकारे कार्यक्रमाचे प्रसारण करावायचे असल्यावरील डीएव्हीपी दरापेक्षा वेगळे दर महासंचालनालय निश्चित करु शकेल.

**४.११ बाह्य व अन्य प्रसिद्धी माध्यमे** (Outdoor / Outdoor Home Media)

बाह्य माध्यमांमध्ये खालील माध्यमांचा समावेश असेल.

१. जाहिरात फलक आणि बिलबोर्ड

२. पोल किऑस्क

३. डीजीटल बोर्ड

४. सार्वजनिक ठिकाणी फ्लेक्स बॅनर

५. बस पॅनल किंवा शेल्टर

६. इल्यूमिनिटेड सायनेज

७. वॉल पेंटीग

८. डिस्प्ले पॅनल

९. हॉलमधील डिस्प्ले

१०. डीजीटल प्लॅटफॉर्मवर आऊटडोअर करिता माध्यम उपक्रम

११. आऊटडोअर माध्यमांशी संबंधित अन्य उपक्रम

वृत्तपत्रे, दूरचित्रवाणी वाहिन्या आणि रेडिओ यांच्या दराचे प्रमाणीकरण (Standardization) करता येते. तथापि, बाह्य माध्यमांच्या (आऊट डोअर) बाबतीत त्या माध्यमांमधील वस्तूंचा आकार, स्थान आणि त्याची आकर्षकता यानुसार विविध हंगामाप्रमाणे (सिझन) या माध्यमांचे दर हे बदलते असतात. त्यामुळे बाह्य माध्यमांसाठी विविध दर निश्चित करता येणार नाही. याकरिता माहिती व जनसंपर्क महासंचालनालय मोहिमेच्या आवश्यकतेनुसार कोणत्या बाह्य माध्यमांचा, किती दिवसांकरिता आणि कोणत्या भौगोलिक क्षेत्रात उपयोग करायचा आहे याचा तपशील निश्चित करील आणि त्यानुसार निवड यादीवरील बाह्य माध्यम संस्थाना त्यांचे देकार देण्यासाठी आमंत्रित करील. या संस्थांना पुढीलप्रमाणे माहिती देण्यात येईल.

- कामाचे परिमाण (कॉन्टम ऑफ वर्क)
- अंदाजित उपलब्ध निधी
- संदेश प्रसारण मोहिमेचे सर्वसाधारण स्वरुप
- लक्ष्यवेधी गटांचे स्वरुप
- वेळापत्रक

महासंचालनालयाने निश्चित केलेल्या (मावज.शासन निर्णय क्र-/२०१५प्र३४/१५३.क्र. दिनांक जुलै २०१७) कार्यपद्धतीनुसार या जाहिरात संस्थानी केलेल्या सदरीकरणाच्या आधारे गुणांकन देऊन दर्जा आणि दर या आधारे आवश्यकतेनुसार एक किंवा त्यापेंक्षा अधिक संस्थाची अटी व शर्तीसह निवड करील. बाह्य माध्यम संस्थांची कामाप्रमाणे निवड करुन त्यांच्यामार्फत शासकीय संदेश प्रसारणाचे काम करुन घेण्यात येईल. त्यानुसार या तपशीलवार माहितीच्या आधारे नमूद खर्चाच्या मर्यादित संस्था सादरीकरण करतील.

४.१२ **वेब आणि समाज माध्यमे** (Web & Social Media)

अ) नव्याने उदयास आलेल्या समाजमाध्यमांमार्फत शासकीय संदेशाचे प्रसारण तसेच शासकीय योजनांबाबत जनजागृती करण्यासाठी माहिती व जनसंपर्क महासंचालनालय वेब आणि समाजमाध्यमे (सोशल मीडिया) नियमावली राबविण्यात येईल.

आ) **समाजमाध्यमांचे विविध प्लॅटफॉर्म्स-**

- **सोशल नेटवर्किंग** उदा.- फेसबुक, गुगल प्लस, लिंक्डइन
- **मायक्रोब्लॉगिंग** उदा.- ट्विटर, टंब्लर
- **ब्लॉगिंग**- उदा.- ब्लॉगर, वर्डप्रेस
- **फोटो शेअरिंग**- उदा.- इन्स्टाग्राम, फ्लिकर, पिंटरेस्ट, स्नॅपचॅट

- **व्हिडिओ शेअरिंग-** उदा.- युट्यूब, विमिओ, पेरिस्कोप
- **सोशल म्युझिक प्लॅटफॉर्म-** उदा.- साउन्डक्लाऊड, पॉडकॉस्ट
- **इन्स्टन्ट मेसेंजिंग-** उदा.- व्हॉटसअप, टेलिग्राम

इ) वरील समाजमाध्यमांचा वापर करुन शासनाचे उपक्रम, योजना, निर्णय, लोकाभिमुख कार्यक्रम अधिकाधिक वापरकर्त्यांपर्यंत पोहोचविता येईल. त्यासाठी या माध्यमांवरुन संबंधित योजनांचे पोस्ट्स, व्हिडिओज, ग्राफिक्स, डिझाईन (विविध फॉर्मेटमधील) ठराविक रक्कम खर्च (Paid) करुन प्रसारित करण्यात येतील. शासनस्तरावर (केंद्र आणि राज्य) नवे माध्यम म्हणून समाजमाध्यमांचा वापर केला जात असून वृत्तपत्रे, दूरचित्रवाहिनी या माध्यमांसारखे समाजमाध्यमांचा उपयोग करण्यासाठी कोणतेही जाहिरात दर निश्चित केलेले नाहीत. समाजमाध्यमांचे प्रकार, त्याची लोकप्रियता आणि वापरानुसार प्रत्येक समाजमाध्यमांच्या प्लॅटफॉर्मचे दर हे वेगवेगळे आहेत, त्यातच एखादी पोस्ट अधिकाधिक लोकांपर्यंत पोहोचविणे (Reach/View), वापरकर्त्यांना या प्लॅटफॉर्मचे अनुसरण (Follow) करायला सांगणे असे प्रत्येक उपक्रमाचे दर हे प्लॅटफॉर्मनिहाय वेगवेगळे आहेत.त्यामुळे संबंधित सोशल मीडिया प्लॅटफॉर्मचे प्रत्येक उपक्रमासाठी (activity) साठी विहित केलेले दर आणि अधिक प्रक्रिया शुल्क देऊन महासंचालनालय सोशल मीडियावरुन मोहीम राबविल.

ई) माहिती व जनसंपर्क महासंचालनालय विविध समाजमाध्यमांवरुन प्रसिद्धी मोहीम राबविताना खालील बाबींचा विचार करुन तपशील निश्चित करेल.

अ) मोहिमेतील विषयानुसार सोशल मीडिया प्लॅटफॉर्मची निवड-

आ) मोहिमेत प्लॅटफॉर्मनुसार वापरायचे फॉर्मेट (ग्राफिक्स, व्हिडिओ, जीफ आदी)

इ) मोहिमेचा कालावधी-

ई) स्थळ किंवा क्षेत्र (कोणत्या प्रादेशिक विभागांसाठी की राज्यासाठी )-

उ) माहिती पोहोचविण्याचे उद्दिष्ट असलेली लोकसंख्या-

उ) उपरोक्त बाबींचा संपूर्ण सविस्तर तपशील निश्चित करुन त्यानुसार निवडसूचीवरील माध्यम संस्थांना त्यांचे देकार देण्यासाठी आमंत्रित करेल. या संस्थांना खालीलप्रमाणे माहिती देण्यात येईल.

अ) वेबसाइट, वेब पोर्टल्स, ब्लॉग, मायक्रो ब्लॉग, मायक्रोसाइट्स, मोबाईल ॲप्लिकेशन्स यासह अमर्यादित सोशल मीडिया प्लॅटफॉर्म्सचे संकल्पनात्मक, विकास आणि व्यवस्थापन करणे.

ब) विविध पारंपारिक माध्यमांबरोबरच समाजमाध्यमांद्वारे माहितीचे जलद आणि कार्यक्षमतेने प्रसारण होण्यासाठी विविध पर्याय विकसित करणे.

क) इंटरनेट ब्रॉडकास्टसह किंवा त्याशिवाय दुहेरी बहुमाध्यमांद्वारे लाईव्ह सेवा देणे. उदा- स्ट्रीमिंग, फेसबुक लाईव्ह, पेरिस्कोप इत्यादी

ङ) समाजमाध्यमे आणि वेब सेवांच्या माध्यमातून मुद्रित, दुरचित्रवाहिन्या, नभोवाणी आदी सर्व माध्यम प्रकारांचे अवलोकन करणे

ऊ) विविध समाजमाध्यम प्लॅटफॉर्मवर सर्जनशील साहित्य, मजकूर (क्रिएटिव्ह कन्टेन्ट) विकसित करून अपलोड करण्याचे काम एजन्सी करेल. बॅनर्स, व्हिडिओज,इन्फोग्राफिक्स, ग्राफिक्स, डिझाइन, अर्कचित्रे, कार्टून्स, ॲनिमेशन आदी सर्व प्रकारांचा यात समावेश असेल. अपलोड केलेल्या मजकुराचे अद्ययावत सुसज्ज व्यवस्थापन चमूद्वारे दैनंदिन पर्यवेक्षण करण्याचीही एजन्सीची जबाबदारी असेल.

उपरोक्त घटकांनुसार वेब-सोशल मीडियावरुन प्रसिद्धीसाठी निवड यादीवरील संस्थांकडून कामाच्या मर्यादेत देकार मागवले जातील. आणि त्यातील योग्य, अनुभवी संस्थांची या कामासाठी निवड केली जाईल.

५. संबंधित वृत्तपत्रांनी करावयाच्या अर्जाचा नमुना, प्रमाणपत्रे यांचे नमुने, पडताळणीचा नमुना इत्यादी संदर्भातील नमुने माहिती व जनसंपर्क महासंचालनालयाने तयार करुन ते महासंचालनालयाच्या वेबसाईटवर उपलब्ध करुन द्यावेत.

६. सदर शासन निर्णय वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.३९३/२०१८, दि.३०/११/२०१८ व नियोजन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्र.२३७/२०१८, दि.१७/१२/२०१८ अन्वये मिळालेल्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेतांक क्र. २०१८१२२०१८१८३८०२०७ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Ramkisan Narayanrao Musale

Digitally signed by Ramkisan Narayanrao Musale
DN: c=IN, o=Government of Maharashtra, ou=General Administration Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=e28f6332f6edfebdfb055bf154f99ec0b0d9e613209e20e7a215f026da6875ae, cn=Ramkisan Narayanrao Musale
Date: 2018.12.20 18:22:39 +05'30'

**(रा.ना.मुसळे)**
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

**प्रति,**

मा.राज्यपालांचे सचिव,
मा.मुख्यमंत्र्यांचे सचिव,
सर्व मा.मंत्री / मा.राज्यमंत्री यांचे सचिव,
मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानसभा,
मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधान परिषद,
मा.मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य,
सर्व मा.अपर मुख्य सचिव / मा.प्रधान सचिव / मा.सचिव,
सर्व मंत्रालयीन विभाग,

सर्व विभागीय आयुक्त,
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
सर्व मंडळे/ महामंडळे/ स्थानिक स्वराज्य संस्था / शासनाच्या स्वायत्त संस्था,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ शाखा, मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
* प्रबंधक, लोकायुक्त आणि उप लोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
महासंचालक (माहिती), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
महालेखापाल, महाराष्ट्र १/२, (लेखा व अनुज्ञेयता), मुंबई/ नागपूर,
महालेखापाल, महाराष्ट्र १/२, (लेखापरिक्षा), मुंबई/ नागपूर,
अधिदान व लेखा अधिकारी, मुंबई,
सर्व मंत्रालयीन विभागांच्या अधिपत्याखालील विभाग प्रमुख व कार्यालय प्रमुख,
सर्व संचालक (माहिती), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
उपसंचालक (माहिती), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय, महाराष्ट्र परिचय केंद्र, नवी दिल्ली,
सर्व उपसंचालक (माहिती), माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
सर्व जिल्हा माहिती अधिकारी, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
सर्व उप माहिती कार्यालये, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय,
निवड नस्ती.

* पत्राने

२८

शासकीय जाहिरात वितरण धोरणात सुधारणा करण्याबाबत

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन निर्णय क्र.जाहिरात २००९/प्र.क्र.१३७/का-३४
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.**
**दिनांक - ३१ ऑगष्ट,२००९**

वाचा -
१) शासन निर्णय सा.प्र.वि.क्र.पीयुबी १०००/प्र.क्र.७३/२०००/३४, दि. १ मे, २००१
२) शासन शुध्दीपत्रक सा.प्र.वि.क्र.पीयुबी १०००/प्र.क्र.७३/२०००/३४, दि. ८ ऑगष्ट,२००१
३) शासन निर्णय सा.प्र.वि.क्र.पीयुबी १०००/प्र.क्र.७३/२०००/३४, दि. १९/१२/ २००१
४)शासन निर्णय सा.प्र.वि. क्र.पीयुबी १०००/प्र.क्र.७३/२०००/३४, दि.७ मे,२००२
५)शासन निर्णय सा.प्र.वि. क्र.पीयुबी २००५/३००/प्र.क्र.५०/३४, दि. १ जून,२००५
६))शासन निर्णय सा.प्र.वि.क्र.जाहिरात २००८/३७४/प्र.क्र.३२/३४, दि.-६ मे, २००८

**शासन निर्णय**

महाराष्ट्र शासनामार्फत वृत्तपत्रांना / **नियतकालीकांना** देण्यात येणा-या वर्गीकृत व दर्शनी जाहिरातींचे धोरण तत्कालीन राज्यमंत्री यांचे अध्यक्षतेखालील समितीने केलेल्या शिफारशींच्या अनुषंगाने वर नमूद केलेल्या दिनांक १ मे,२००१ च्या शासन निर्णयान्वये प्रसृत करण्यात आले आहे. दिनांक १ मे,२००१ नंतर वृत्तपत्र क्षेत्रात झालेले परिवर्तन वृत्तपत्र कागद, शाई व इतर पूरक सामग्रीच्या दरामध्ये झालेली वाढ, अत्याधुनिक माहिती तंत्रज्ञानामुळे वृत्तपत्र क्षेत्रात झपाटयाने झालेला बदल या बाबी विचारात घेऊन सन २००१ मध्ये निश्चित केलेल्या शासकीय जाहीरात वितरण धोरणात काही बाबींमध्ये बदल करण्याची आवश्यकता दिसून आल्यामुळे दिनांक १ मे,२००१ च्या शासन निर्णयान्वये प्रसृत केलेल्या व वेळोवेळी सुधारित केलेल्या शासकीय जाहिरात वितरण धोरणाचे पुनर्विलोकन करुन आवश्यक त्या ठिकाणी पुन्हा सुधारणा सुचविणेकरिता मा.राज्यमंत्री (मा.व.ज.) यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ६ मे,२००८ च्या शासन निर्णयान्वये समिती स्थापन करण्यात आली होती. सदर समितीने सादर केलेल्या अहवालातील शिफारशींवर विचार विनिमय करुन शासन निर्णय दिनांक १ मे,२००१ अन्वये प्रसृत केलेल्या व वेळोवेळी सुधारित केलेल्या जाहिरात वितरण

2e

स्वराज्य संस्था, इत्यादी स्वायत्त संस्था यांनी त्यांच्या वर्गीकृत तसेच दर्शनी जाहिराती देताना शासकीय धोरणाची अंमलबजावणी काटेकोरपणे करावी व त्यांनी त्यांच्या जाहिराती शासनाच्या जाहिरात वितरण धोरणानुसारच देण्यात आल्या असल्याबाबत संबंधितांसमोर स्पष्ट करावे.

(१२) दिनांक १ मे,२००१ च्या शासन निर्णयाच्या जोडपत्र-अ मधील नियम क्र.५-इ मधील वृत्तपत्रनिहाय प्रसिध्द होणा-या जाहिरातींची मुल्य मर्यादा खालीलप्रमाणे सुधारित करण्यास मान्यता देण्यात येत आहे.

| अ क्र. | एका कामाचे मुल्य | जाहिरात वितरण करण्याचे अधिकार | जाहिरात प्रसिध्दीचे वृत्तपत्र |
|---|---|---|---|
| १ | जाहिरातीतील ज्या एका कामांचे मुल्य रुपये २० लाखापर्यंत आहे अशी जाहिरात. | जिल्हा माहिती अधिकारी | एक 'क' वर्ग दैनिक व एक साप्ताहिक |
| २ | जाहिरातीतील ज्या एका कामाचे मुल्य रुपये २० लाखाच्या वर ते ५५ लाखापर्यंत आहे अशी जाहिरात. | विभागीय माहिती उप संचालक | एक 'ब' वर्ग दैनिक व साप्ताहिक |
| ३ | जाहिरातीतील ज्या एका कामाचे मुल्य रुपये ५५ लाखापेक्षा अधिक आहे अशी जाहिरात. | मुख्यालय | १)संबंधित विभागातील अ वर्ग दैनिकास व त्या विभागातील ब व ज्या जिल्हयाचे काम असेल त्या जिल्हयातील एका क वर्ग दैनिकास आळीपाळीने त्या वर्गातील वृत्तपत्रांचे से.मी.चे प्रमाण लक्षात घेऊन जाहिरातींचे वितरण करण्यात येईल. |

(१३) दिनांक १ मे,२००१ च्या शासन निर्णयाच्या जोडपत्र-अ मधील नियम क्र. १४,ब मधील तरतुदी ऐवजी खालीलप्रमाणे सुधारित तरतूद समाविष्ट करण्यात येत आहे :-

राष्ट्रीय ऐक्य, राष्ट्रीय सुरक्षा सामाजिक ऐक्य, कायदा व सुव्यवस्थेस बाधक ठरणारे, जातीय तेढ निर्माण होईल असे द्वेषमुलक लिखाण करणा-या तसेच वृत्तपत्रीय आचार संहितेचा भंग करणारा मजकूर आणि छायाचित्रे छापणा-या वृत्तपत्रांना शासनमान्य यादीवर घेण्यात येणार नाही. शासनमान्य यादीवरील वृत्तपत्रांनी असे लिखाण केल्यास अथवा छायाचित्र छापल्यास कोणतीही पूर्वसूचना न देता यादीवरुन कमी करण्याचे अधिकार महासंचालक, माहिती व जनसंपर्क यांना राहतील.

प्राप्त दि. ५।११।२०१९ वार बुधवार
मध्यान्हकाळी ३ वा ४५ मि

गोषवारा प्राप्त दि. 08/11/2019 03.45 pm
मा. स्थायी समिती / मा. ~~महासभा~~ गोषवार नोंद
रजिस्टर अ. क्र ...... 48 ...... वर्ष :- 2019-20

लिपीक
नगरसचिव विभाग
मिरा भाईंदर महानगरपालिका